रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ३५९
www.ramprahar.com
मंगळवार, १६ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग
आषाढी वारीत सात लाख वारकऱ्यांवर उपचार/२
पुरात वाहून गेलेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडला/५
पॉवरलिफ्टर अमृता भगतला सुवर्णपदक/८

## भाजप राज्यात काढणार संवाद यात्रा, पुण्यात अधिवेशन



**नागपूर** : विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजप राज्यस्तरीय संवाद यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहचणार आहे. येत्या २१ जुलै रोजी पुण्यात राज्यातील पाच हजार भाजप पदाधिकाऱ्यांचे अधिवेशन होणार असून त्यात केंद्रीय मंत्री अमित शाह, नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संवाद यात्रेची रूपरेषा तसेच तारीख निश्चित केली जाणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी (दि. १५) दिली. नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, महाराष्ट्रातील भाजपचे १९ वरिष्ठ नेते संवाद यात्रेत सहभागी होतील. ही यात्रा सर्व ४८ लोकसभा, सर्व विधानसभा तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका क्षेत्रात पोहचेल. या माध्यमातून सरकारचे निर्णय, योजना, कामे जनसामान्यांपर्यंत पोहचविणार आहोत.

# कोकण रेल्वे ट्रॅकवर

## २७ तासांनंतर वाहतूक पूर्ववत



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेची वाहतूक तब्बल २७ तासांनंतर पुन्हा सुरू झाली. मुसळधार पावसामुळे रविवारी रत्नागिरीतील खेडजवळील दिवाणखवटी येथे रेल्वेमार्गावर दरड कोसळली होती. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. रुळावरील दरड आणि चिखल हटवण्यात प्रशासनाला सोमवारी (दि. १५) सायंकाळी यश आले.

रेल्वे ट्रॅकवर कोसळलेली दरड बाजूला करण्यासाठी प्रशासन आणि रेल्वे कर्मचाऱ्यांकडून अथक प्रयत्न सुरू होते. अखेर रुळावर आलेला दरडीचा मलबा सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आला. या कामासाठी रेल्वेचे ५० कर्मचारी, दोन जेसीबी, दोन पोकलेन, ट्रॅक्टर अशी यंत्रसामुग्री वापरण्यात आली. सर्व यंत्रणेने युद्धपातळीवर काम करून रेल्वेसेवा पूर्ववत केली आहे. या दरम्यान पावसाचाही अडथळा आला, मात्र रूळावर आलेला चिखल आणि माती काढून टाकण्यात आली आहे.

दरड हटवल्यानंतर प्रथम रेल्वे डिझेल इंजिनने ट्रॅकची चाचणी करण्यात आली. त्यानंतर पॅसेंजर गाड्या या मार्गावरुन धावण्यास सुरुवात झाली. यामुळे २७ तासांपासून अडकून पडलेल्या प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, अडकून पडलेल्या रेल्वे प्रवाशांसाठी परतीच्या प्रवासासाठी एसटी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. विविध रेल्वे स्टेशनवरून खोळंबलेल्या प्रवाशांना या माध्यमातून सोडण्यात आले.

## रत्नागिरीत डोंगर खचला; थरारक घटना व्हिडीओत कैद



**दापोली** : कोकणात पावसाचा कहर पहायला मिळत आहे. अशातच रत्नागिरीमधील दापोली तालुक्यात साखरोली येथे डोंगर खचल्याची घटना घडली आहे. डोंगराची माती खाली येतानाचा थरारक व्हिडीओ कॅमेऱ्यात कैद झाला असून व्हायरल होत आहे.

जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून सर्वत्र जोरदार पाऊस पडत आहे. दरम्यान, अनेक ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटनादेखील घडल्याच्या समोर येत आहेत. दापोली तालुक्यातील साखरोली येथे डोंगर खाली आला. मानवी वस्तीच्या जवळच हा डोंगर खचल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महिलांच्या उन्नतीसाठी महायुतीचे सरकार कटीबद्ध –चित्रा वाघ

## कळंबोलीत नारीशक्ती सन्मान सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्यातील महायुतीचे सरकार कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन भाजप महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी रविवारी (दि. १४) कळंबोली येथे केले. त्या नारीशक्ती सन्मान सोहळ्यात बोलत होत्या.

पनवेल महापालिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली सेक्टर १ ई मधील नवीन सुधागड शाळेत नारीशक्ती सन्मान सोहळा, विद्यार्थी गुणगौरव, महिलांसाठी खेळ पैठणीचासह विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोनिका महानवर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व उपक्रमांचे कौतुक केले.

या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अमर पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, प्रकाश महानवर, प्रभाग अध्यक्ष रामा महानवर, बबन बारगजे, संदीप म्हात्रे, आबा घुटुगडे, सुनील ठोंबरे, संदीप म्हात्रे, संजय दोडके, कळंबोली सरचिटणीस दुर्गा सहानी, शुभांगी निर्मळे, शोभा माने, अपर्णा सरोज, रेणूका जाधव, वनिता येरकर, साक्षी गावडे, निशा नेवसे, प्रियंका सोनवलकर, लैला शेख, रानी रानपूर, बायजा बारगजे, आशा मालव, रामदास महानवर युवा मंचचे शुभम रास्कर, प्रवीण मोरे, प्रशांत शिंदे, तुषार कोकरे, रणजीत जगताप यांच्यासह पदाधिकारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या वेळी १० महिलांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तसेच दहावी व बारावीच्या परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

## खालापूर, पाली नगरपंचायतीच्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर

### ११ ऑगस्टला मतदान, दुसऱ्या दिवशी मतमोजणी

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यातील खालापूर आणि पाली नगरपंचायतीच्या प्रत्येकी एका रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. दोन्ही ठिकाणी ११ ऑगस्ट रोजी मतदान आणि दुसऱ्या दिवशी म्हणजेच १२ ऑगस्टला मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे.

खालापूर नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १ (अनुसूचित जाती) आणि पाली नगरपंचायतीच्या प्रभाग क्र. १० (सर्वसाधारण महिला)मध्ये पोटनिवडणूक होणार आहे. यासाठी नामनिर्देशनपत्र निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्धतेचा कालावधी १८ जुलै सकाळी ११ ते २४ जुलै दुपारी २पर्यंत आहे. अर्ज स्वीकारण्याचा कालावधी १८ ते २४ जुलै (२० व २१ तारखेची सुट्टी वगळून सकाळी ११ ते दुपारी ३पर्यंत) आहे. छाननी २५ जुलै, अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे ३१ जुलै दुपारी ३ वाजेपर्यंत, अपील असल्यास वैधरित्या नमानिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत जिल्हा न्यायाधिशाकडे अपील करता येईल. आवश्यक असल्यास ११ ऑगस्ट सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० मतदान, तर मतमोजणी १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून खालापूरमध्ये तहसील कार्यालय नेताजी पालकर सभागृह, तर सुधागडात तहसील कार्यालय हिरकणी कक्ष येथे होईल.

## सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे येत्या शनिवारी पारितोषिक वितरण

### मान्यवरांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या २३व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण केले जाणार आहे. हा समारंभ शनिवारी (दि. २०) सायंकाळी ४ वाजता मुंबईत मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी)समोरील मुंबईत मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, सुप्रसिद्ध कवियत्री व लेखिका श्रीमती नीरजा, माध्यम सल्लागार जयु भाटकर यांची उपस्थिती लाभणार आहे.

वाचन संस्कृतीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण असलेल्या या समारंभाचा साहित्यप्रेमींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी केले आहे. (पान २ वर..)

## निवडक

### मुंबईच्या मरिन ड्राइव्ह येथील समुद्रात तरुणीची आत्महत्या

**मुंबई** : मरिन ड्राइव्ह येथील समुद्रात उडी घेत एका तरुणीने आत्महत्या केल्याची घटना सोमवारी (दि. १५) घडली. पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी समुद्रातून तरुणीला बाहेर काढून जी.टी. रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी ती मृत असल्याचे घोषित केले. ममता प्रवीण कदम (वय २३) असे या तरुणीचे नाव असून ती एका प्रसिद्ध आयटी कंपनीत कामाला होती. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### आजपासून दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा

**पुणे** : राज्य मंडळातर्फे दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा मंगळवार (दि. १६)पासून सुरू होत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या नोंदणीमध्ये मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे. राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावीची पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ३० जुलै या कालावधीत, तर बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत घेतली जाणार आहे.

## कार्लेखिंडीत एसटी बसचा अपघात; चार प्रवासी किरकोळ जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-पेण मार्गावर कार्लेखिंड येथे चालकाचे नियंत्रण सुटल्याने एसटी बस सोमवारी (दि. १५) सकाळी कलंडली. या अपघातात चार प्रवासी किरकोळ जखमी झाले. ही बस संरक्षक कठड्यावर आदळून झाडाला अडकल्याने मोठा अनर्थ टळला.



अलिबाग ते पनवेल अशी धावणारी बस सोमवारी सकाळी सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास कार्लेखिंडीतील अवघड वळणावर आली असता चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटून ती रस्त्यालगत असलेल्या लोखंडी संरक्षक कठड्यावर आदळून कलंडली. सुदैवाने संरक्षक कठड्याच्या बाहेरील बाजूस मोठे झाड होते, त्या झाडाला बस अडकून पडली. पोलीस व इतर बचाव यंत्रणा घटनास्थळी पोहचल्या. त्यांनी बसमधील ४० प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले.

जखमी प्रवाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. कलंडलेली बस क्रेनच्या सहाय्याने सरळ करण्यात आली.




**पनवेल : राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्प सादर झाला. या अर्थसंकल्पात सामान्य नागरिकांना न्याय देऊन विविध योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. या योजनांची माहिती प्रत्यक्ष जनतेपर्यंत नेऊन लाभ मिळवून देण्याकरिता खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात महाराष्ट्राच्या विकासाचा अर्थसंकल्प या विषयावर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत रविवारी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, चिटणीस रमेश मुंडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजप खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

# राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

## हवामान खात्याकडून अलर्ट जारी



**पुणे : प्रतिनिधी**

जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत काहीसा थांबलेल्या मोसमी पावसाने पुन्हा जोर पकडला आहे. गेल्या आठवड्यापासून राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे काही जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने पावसाचा अलर्ट जारी केला असून येत्या १८ जुलैपर्यंत राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

मराठवाडा तसेच विदर्भातील बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि धाराशिव जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे, तर विदर्भातील अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर तसेच नागपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे. ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. याचवेळी वाऱ्याचा वेग हा ताशी ४० ते ५० किलोमीटर राहील.

केरळ, कर्नाटक आणि गोव्याच्या काही भागांमध्ये पुढील काही दिवसांत २० सेंटीमीटरपेक्षा जास्त पाऊस पडेल. दरम्यान, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर रेड अलर्ट देण्यात आला आहे.

## शैक्षणिक सुयश



**पनवेल : सतारवादक वैभव उमेश चौधरी यांनी कुटूंब सधन असतानाही आपल्या शिक्षणासाठी कोणतीही आर्थिक मदत न घेता कमवा आणि शिका या उद्दिष्टाला अनुसरून बार काउन्सिल ऑफ इंडिया सदस्यत्व आणि मास्टर ऑफ लॉ ही प्रगत पदव्युत्तर शैक्षणिक पदवी अर्थात एलएलएम शिक्षण पूर्ण केले. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून कौतुक केले. या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, रायगडभूषण उमेश चौधरी तसेच प्रभाकर जोशी उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

## रायगड जिल्हा नियोजन समितीची आज बैठक

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत हे मंगळवारी (दि. १६) जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात नियोजन समितीची बैठक, तर दुपारी १ वाजता जिल्हा डोंगरी विभाग विकास समिती बैठक होणार आहे.

**लाडकी बहीण योजनेचाही होणार शुभारंभ**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ कार्यक्रम पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत दुपारी २ वाजता कुरूळ येथील आरसीएफ हॉलमध्ये होणार आहे. या कार्यक्रमात या योजनेतील पात्र महिलांना प्रतिनिधिक स्वरूपात लाभ प्रमाणपत्र देण्यात येणार आहे तसेच जिल्हा परिषद सेस निधीतून विविध घटकांना ई-शॉप वाहन वितरण करण्यात येणार आहे.

# आषाढी वारीत तब्बल सात लाख वारकऱ्यांवर उपचार

## आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी उपक्रम

**पुणे : प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त राज्यातून वेगवेगळया ठिकाणाहून निघालेल्या पालख्यांच्या प्रस्थानापासून रविवार (दि.१४)पर्यंत एकूण सात लाख पाच हजार वारकऱ्यांवर मोफत उपचार करण्यात आले आहेत. त्यापैकी तीन हजार ८२० रुग्णांवर आंतररुग्ण विभागात उपचार केले आहेत. त्यापैकी संत ज्ञानेश्वरांच्या पालखीत सर्वाधिक तीन लाख ३९ हजार वारकऱ्यांवर उपचार करण्यात आले आहेत.



विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी हा उपक्रम राबवित आहे. या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांना पालखी मार्गावर, मुक्कामाच्या ठिकाणी तसेच पंढरपूर येथे मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. प्रत्येक पाच किमीवर एक आपला दवाखाना तयार असून सहा हजार ३६८ आरोग्य अधिकारी, कर्मचारी सेवा पुरवत आहेत, अशी माहिती पुणे परिमंडळचे आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी दिली.

तात्पुरत्या रुग्णालयात दाखल करून तीन हजार ८२० रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. पालखी आणि दिंडी मुक्कामी असणाऱ्या ठिकाणी पाच खाटांचे तात्पुरते अतिदक्षता कक्ष तयार केले आहेत. येथे ऑक्सिजन, मॉनिटर, औषधांसह तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत. गर्दीमध्ये मोठी ॲम्ब्युलन्स फिरु शकत नसल्याने ताप, सर्दी, खोकला, ड्रेसींग, जुलाबाचा त्रास कोणाला होत असेल तर त्यासाठी फिरत्या बाईक ॲम्बुलन्सदेखील तैनात ठेवण्यात आल्या आहेत.

फिरत्या ॲम्बुलन्सबरोबरच १०२ व १०८ या रुग्णवाहिका पालखी मार्गावर सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत, तसेच पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आली आहे. याबरोबरच स्तनदा मातांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सोय करण्यात आली आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाच्या उड्डाणपुलावरील पाणी रस्त्यावर

## पावसाच्या पाण्याचा निचरा व्यवस्थित करण्याची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील महाडनजीक असलेल्या उड्डाणपुलावरील पाणी थेटखालील रस्त्यावर कोसळत असल्याने स्थानिक नागरिकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करणारे व्यवस्थापन कुचकामी ठरत असल्याने रस्त्यावर पाण्याचा प्रवाह तयार होत आहे. पावसाळी पाणी निचरा करण्यासाठी योग्य नियोजन केले नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.

गेली दशकापासून सुरू असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाच्या गुणवत्तेवर कायम प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. रस्ता समतोल पातळीत नसल्याने होणाऱ्या जम्पिंगमुळे वाहनांचे नुकसान होत आहे. या मुंबई-गोवा महामार्गाच्या संपूर्ण कामाबाबत कोकणवासीयांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

पावसाळ्यात कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळतो. या पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी योग्य नियोजन करण्याची गरज होती, मात्र



मुंबई-गोवा महामार्गावर आजही अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचून राहत आहे. महाड शहरानजीक नातेखिंड येथून थेट चांभारखिंड ते नडगावपर्यंत ठिकठिकाणी उड्डाणपुलांची निर्मिती केली आहे.

या उड्डाणपुलावर पाणी साचून राहू नये म्हणून उड्डाणपुलावरून पाईप टाकण्यात आले आहेत. हे पाईप खाली असलेल्या रस्त्यालगत गटारामध्ये सोडणे अपेक्षित होते, मात्र ठेकेदाराने हे पाईप गटारापासून काही अंतरावर तसेच सोडून दिले आहेत. यामुळे उड्डाणपुलावरील पाणी खाली असलेल्या गटारावरील स्लॅबवर कोसळत थेट रस्त्यांवर वाहत आहे.

यामुळे रस्त्यावर पाण्याचा नाला वाहत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पाण्याबरोबर येणाऱ्या दगड, कचरा रस्त्यावर साचून राहत असल्याने पायी चालणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होत आहे.

पावसाळी पाणी रस्त्यावर साचल्याने अपघाताची देखील शक्यता निर्माण होत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# चिरेखिंड-आंबेमाची रस्त्यावर दरड

## प्रशासनाने ढिगारा हटवून वाहतूक केली सुरळीत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील आंबेनळी घाटातील चिरेखिंड ते आंबेमाची रस्त्यावर रविवारी (दि.१४) मातीचा ढिगारा झाडांसह पडल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली. यानंतर तालुका प्रशासनाने तातडीने दरड हटवून वाहतूक पूर्ववत केली.

पोलादपूर-वाई-सुरूर मार्गावरील चिरेखिंड ते आंबेमाची रस्त्यावर मातीचा ढिगारा झाडांसह पडला. या घटनेची माहिती समजल्यानंतर तहसीलदार कपिल घोरपडे, पोलीस निरीक्षक अनिल जाधव, हवालदार स्वप्नील कदम यांच्यासह कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचत पाहणी करून वाहतूक सुरू करण्यासाठी तातडीने



प्रयत्न केले. जेसीबी पाठवून रस्त्यावर आलेली झाडे बाजूला सारण्यात आली.

तालुका आपत्ती निवारण कक्ष उद्‌भवणाऱ्या परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे सांगण्यात आले आहे.

## अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार रिक्त पदे लवकरच भरणार -आदिती तटकरे

**मुंबई** : राज्यातील अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार ६९० रिक्त पदे लवकरच भरण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण, आदिवासी प्रकल्पातील कार्यरत अंगणवाडी केंद्रांमध्ये अंगणवाडी मदतनीसांची १३ हजार ९०७ रिक्त पदे आहेत. शहरी प्रकल्पातील कार्यरत अंगणवाडी केंद्रांमध्ये ७८३ अंगणवाडी मदतनीसांची रिक्त पदे आहेत. त्यानुसार ३१ ऑगस्टपर्यंत राज्यातील १४ हजार ६९० मदतनीसांची रिक्त पदे भरण्यात यावीत, अशा सूचना सर्व जिल्हा व प्रकल्पस्तरावर देण्यात आल्या आहेत.

याबाबतची जाहिरात लवकरच प्रसिद्ध होणार आहे. इच्छुक महिलांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले आहे.

# रोहा-तांबडी मुख्य जिल्हा मार्ग खचला

## उत्खनन केल्यामुळे प्रकार घडल्याचे अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोहा-तांबडी रस्ता खचला आहे. तीन दिवसांपासून तालुक्याला पावसाने अक्षरश: झोडपून काढले. यातूनच तांबडी गावाजवळ रस्ता खचला असून वाहतूक बंद झाली आहे.

दरम्यान रोहा तांबडी रस्ता, मेहेंदळे हायस्कूल परिसर व निवी गावातील शिल्पनगरी परिसर अचानक आलेल्या पाण्याच्या लोंढ्यानी भयभीत झाला. डोंगरातील झाडे समूळ उपटून सपाटीकरण केल्याने मातीत पाणी धरून राहिले नाही. डोंगराच्या लाल मातीसह आलेल्या लोंढ्याने सर्वत्र चिखलाचा राडारोडा झाला. पर्यावरणप्रेमींनी वारंवार संपूर्ण डोंगर फोडले जात असल्याविरोधात तक्रारी केल्या आहेत, मात्र तात्पुरती कार्यवाही करून विकासकांना रान मोकळे केले जाते. या प्रलयामुळे प्रशासनाविरोधात नागरिकांतून प्रचंड संताप व्यक्त होत आहे.



या रस्ता खचल्याची दखल घेऊन सार्वजनिक बधंकाब विभागाचे आधिकरी विजय बागुल यांनी घटनास्थळी पाहणी करून सांगितले की, या घटनेला मुख्यतः समोरील खोदकाम जबाबदार आहे तसेच पाण्याचा प्रवाह बदलल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली आहे. विभागाद्वारे ठेकेदाराला सांगून तत्काळ रस्त्याची दुरूस्ती केली जाईल, असे सांगितले.

## पोलीस कर्मचारी राहुल कडू यांची आत्महत्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील कर्मचारी राहुल कडू यांनी आपल्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. राहुल यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप समोर आले नसले तरी या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



तरुण आणि मनमिळावू व्यक्तिमत्त्व असलेले राहुल सध्या अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात कार्यरत होते. सुधागड तालुक्यातील घोटवडे या आपल्या गावी असताना त्यांनी तिथेच गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. मागील काही दिवसांपासून ते वैद्यकीय रजेवर होते. राहुलने आत्महत्येचा निर्णय का घेतला असावा, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.

# मधु कांबळे यांना पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील एक आघाडीचे शिलेदार आणि भारताच्या समाजवादी चळवळीतील एक ध्येयवादी कार्यकर्ते दिवंगत श्री दिनू रणदिवे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी दिला जाणारा पत्रकार दिनू रणदिवे स्मृती पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे यांना जाहीर झाला आहे.



पत्रकार दिनू रणदिवे स्मृती पारितोषिक समितीतर्फे शुक्रवारी (दि.१९) मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री सत्यरंजन धर्माधिकारी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यसभेचे माजी सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर असतील.

यंदा पुरस्काराचे चौथे वर्ष आहे. २५,००० रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष माजी राज्यसभा सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर हे असून प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरबीर सिंग, हिंदुस्थान टाइम्स (मराठी)चे संपादक हारीस शेख, प्रकाश महाडिक आणि पुष्पा महाडिक हे निवड समितीचे सदस्य आहेत.

# कविवर्य नारायण सुर्वेंच्या घरी चोरी

## ■ नंतर उपरती; चोरलेल्या वस्तू पुन्हा आणून ठेवल्या!

**नेरळ : प्रतिनिधी**

आधी घरात चोरी करून नंतर त्याच चोरलेल्या वस्तू परत ठेवत चोरट्याने घर मालकाची माफी मागितली असल्याचा प्रकार समोर आला. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या घरात ही चोरी झाली असून अज्ञात चोरट्याने चोरलेल्या वस्तू परत करीत असल्याची एक भावनिक पोस्ट घराच्या भिंतीवर लिहिल्याने माहिती समोर आली. नेरळ पूर्व परिसरात गंगा नगर येथील पद्मश्री नारायण सुर्वे विद्यापीठ या घरात चोरी झाली.

प्रसिद्ध ज्येष्ठ कविवर्य नारायण सुर्वे यांचा इतिहास सर्वांना माहितच आहे. ते राहत असलेल्या नेरळ येथील गंगानगर परिसरातील पद्मश्री नारायण सुर्वे विद्यापीठ या घरात त्यांची मुलगी आणि जावई वास्तव्यास असून आठवणी जपून ठेवल्या आहेत. कल्पना घारे दाम्पत्य १० दिवसांसाठी आपल्या मुलाकडे गेले होते. दरम्यान घरावर रेखी ठेवून बसलेल्या चोरट्याने घारे घरात नसल्याचा फायदा घेत रविवारी घर फोडून चोरी केली. गेले दोन ते तीन दिवस हा चोर घरातील वस्तू चोरून नेत असल्याचा अंदाज लावण्यात आला. चोरट्याला घरात काही भिंतीवरील फोटो आणि काही सत्काराच्या ट्रॉफी, पुरस्कार सर्टिफिकेट पाहिल्यानंतर ज्येष्ठ कविवर्य स्व. नारायण सुर्वे यांचे घर असल्याचे समजले. त्याने भावुक होत चोरलेला माल परत आणून ठेवला आणि घरच्या भिंतीवर एक मजकूर लिहून चोर पळून गेला.

या मजकुरात लिहताना चोर म्हणतो, मला माहित नव्हते की, हे नारायण सुर्वे यांचे घर आहे, नाहीतर मी चोरी केलीच नसती. मला माफ करा, मी जी वस्तू घेतली आहे ती मी परत करेन, मी टीव्ही पण नेला होता तो आणून ठेवला आहे, सॉरी.

घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलीस अधिकरी उपस्थित दाखल झाले होते. अज्ञात चोर हा कविवर्य नारायण सुर्वे यांचा चाहता असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला. सुशिक्षित बेरोजगार म्हणूनच चोरीचा मार्ग निवडला असावा, म्हणून सांगण्यात येत आहे.

पान १ वरुन

## सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे येत्या शनिवारी पारितोषिक वितरण


राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेतील विजेत्या प्रथम क्रमाकांस एक लाख रुपये, व्दितीय ५० हजार, तर तृतीय क्रमाकांस ३० हजार रुपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कृष्ट कथेसाठी सात हजार रुपये, उत्कृष्ट कविता, उत्कृष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ट विशेषांक व उत्कृष्ट मुखपृष्ठ यांना प्रत्येकी पाच हजार रुपये, बालसाहित्याच्या सर्वोत्कृष्ट अंकास ७५०० रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये, व्दितीय २० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी पाच हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्हे असे बक्षिसांचे स्वरूप आहे.



# चौकमध्ये आपत्कालीन यंत्रणेने दर्शविली तत्परता

**चौक : प्रतिनिधी**

गेले चार दिवस सतत पावसाचे थैमान सुरू आहे. त्यामुळे चौक मंडळ महसूल प्रशासन तयारीत होते. कर्जत-चौक रस्ता वर बोरगाव फाटा येथे तर मुंबई पुणे जुन्या रस्त्यावर कलोते येथे रस्त्यावर पाणी साचले होते. तलाठी कावरखे आणि बोरगाव येथे तलाठी बनसोडे यांनी लागलीच उपाय योजना करून पाण्याचा निचरा केला. त्यामुळे वाहतूक कोंडी सुटली. मंडळातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी हे सकाळ पासून उपस्थित राहून परिसरातील माहिती घेत होते, तर तहसीलदार हे स्वतः संपूर्ण परिसराची पाहणी करीत होते.



गेले चार दिवस पावसाचे थैमान सुरू आहे, त्यामुळे पाणी भरणे, झाडांची-घरांची पडझड, अपघात, वाहतूक कोंडी, नदी नाल्यात वाहून जाणे यामुळे कुणी वाहून जाण्याची भीती आहे. त्यामुळे चौक व वासांबे मंडळातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी आपापल्या सजेत कोतवाल आणि सामजिक कार्यकर्ते सज्ज होते.

# योग्य उपाय, सावधगिरीने सर्पदंश मृत्यू रोखता येतील -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पावसाळा सुरू झाल्यामुळे तसेच शेतात काम करताना अनेकदा सर्पदंश होण्याच्या घटना आपल्या जिल्ह्यात घडतात. योग्य उपाय आणि सावधगिरी बाळगल्यास सर्पदंश व त्यामुळे होणारे मृत्यू रोखता येऊ शकतात. याबाबत समाजात जनजागृती करण्याचे काम आरोग्य विभागाने करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



यंदाच्या पावसाळ्यात आरोग्य विभागामार्फत जिल्हा शासकीय रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर सर्पदंश प्रतिबंधक लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात आली आहे. सरासरी १५ ते २५ लसीचा प्रत्येक आरोग्य केंद्रात साठा करण्यात आला आहे. १५ तालुक्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील लस उपलब्ध असून जिल्हास्तरावर अतिरिक्त लस सज्ज ठेवण्यात आली आहे.

सर्पदंश झालेल्या रुग्णांसाठी एएमबीएचयू बॅग, लॅरिंग्रोस्कोप ही साधने, एड्रेनालाईन, हाइड्रोकोर्ट, एट्रोपिन, नियोस्टिग्माइन ही इंजेक्शन जिल्हा रुग्णालयात उपलब्ध ठेवली आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक आरोग्य केंद्रात ऑक्सिजन सिलिंडर भरून ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. नागरिकांनी सर्पदंश झालेल्या व्यक्तीला धीर देऊन सर्वात अगोदर जवळच्या कोणत्याही सरकारी रुग्णालयापर्यंत आणावे.

सर्पदंशाच्या बहुतांश घटना ग्रामीण भागात शेतामध्ये काम करीत असताना घडतात. शेतकऱ्यांनी सर्वतोपरी काळजी घेऊनच शेतात जावे. पायात गमबूट असावेत, तसेच अंगावर पूर्ण कपडे असल्यास दंशाची तीव्रता कमी असते. सर्पदंश हा अपघात असून घाबरून जाऊ नका. सावध रहा काळजी घ्या, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आहे.

## संपादकीय

# समाजात तेढ नकोच

मराठा किंवा ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून समाजात तेढ पसरू नये यासाठी साऱ्याच नेत्यांनी पक्ष विसरून एकत्र येण्याची गरज आहे. तेथे राजकारण उकरून काढू नये असे वाटते. समाजात अशी तेढ वाढणे हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे खचितच नाही.

**गेली काही वर्षे मराठा आरक्षणाच्या आंदोलनाने महाराष्ट्रात जोर पकडल्यानंतर वातावरण वेगाने बदलत गेले हे मान्य करावे लागेल. मराठा आंदोलनाची धुरा सांभाळणारे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या उग्र उपोषणानंतर हा प्रश्न प्रखरतेने समोर आला. वास्तविक मराठा आरक्षणासाठी तत्पूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील सरकारने अतिशय सकारात्मक पावले उचलत हा तिढा सोडवत आणला होता. पुढे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर सारेच नासून गेले. मराठा आंदोलकांनी ओबीसीमधूनच आम्हालाही आरक्षण मिळावे, असा आग्रह धरल्यानंतर प्रकरण चिघळले. आज राज्यातील दोन-तीन जिल्ह्यांतील सामाजिक वातावरणही त्यामुळे बिघडत चालले आहे हे मान्य करावे लागेल. मराठा बांधवांना आरक्षणाचा लाभ मिळायलाच हवा याबद्दल कुणाचेच दुमत नाही. राज्यातील महायुती सरकार त्यासाठी प्रामाणिक प्रयत्नही करताना दिसते आहे. आजवर काही लाख कुणबी नोंदी मिळाल्याचे खुद्द जरांगेदेखील मान्य करतात. या नोंदी शिंदे-फडणवीस सरकारनेच मिळवून दिल्या आहेत हे विसरता कामा नये. तथापि, ओबीसींच्या वाट्यातील आरक्षण मराठ्यांना देऊ नये, ही भूमिका ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी पहिल्यापासूनच मांडली आहे. यामध्ये अंतिमत: मराठा आणि ओबीसी समाजाचेच अपरिमित नुकसान होईल अशी मांडणी ते करतात. या दोन्ही समाजातील वाढत्या तणावामुळे राज्यात काही ठिकाणी परिस्थिती अवघड बनली आहे. याला प्रमुख कारण राजकारण हेच आहे. काही राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते दोन्ही समाजातील दुफळीचा गैरफायदा घ्यायला टपलेले आहेत. काही समाजकंटकांचेही यात फावते आहे. दोन-तीन जिल्ह्यांतले वातावरण त्यामुळे नक्कीच बिघडलेले दिसते. त्यामुळे भुजबळ यांनी पक्षीय अभिनिवेश सोडून सोमवारी सकाळी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांची सिल्व्हर ओक या त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली आणि सामाजिक तेढ मिटवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांना केले. शरद पवार हे राज्यातील जुनेजाणते नेते आहेत. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळीही त्यांनी धडाडीने निर्णय घेऊन प्रश्न मिटवला होता, तसेच ओबीसींना आरक्षण देण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. येत्या काही दिवसात आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलून पुढील कार्यक्रम ठरवू, असे पवार यांनी सांगितल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे. बारामतीतून फोन गेल्याने आरक्षणाबद्दल आयोजित केलेल्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधकांपैकी कोणीही आले नाहीत, असा आरोप भुजबळ यांनी तत्पूर्वी रविवारीच केला होता. मुख्यमंत्री शिंदे असोत किंवा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुतीतील सर्वच धुरीण मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी बांधवांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल असे ठामपणाने सांगतात. त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे. कारण याच नेत्यांनी आजवर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, हे विसरुन चालणार नाही. मुद्दा आहे तो सामाजिक तेढीचा. तेवढे मात्र कधीही घडू नये असे कळकळीने वाटते. ज्येष्ठ नेते असूनही शरद पवार हे मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार आहेत. हेच भुजबळांनाही करता आले असते. ते तर शिंदे यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आहेत.**

# रायगड जिल्ह्यात भातलावणीचे इव्हेंट





**खबरबात**
**धम्मशील सावंत**

पाली सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यात दिलासादायक पर्जन्यवृष्टी झाल्याने बळीराजा सुखावला आहे. सध्या भात रोपे तरारली असून शेतकरी भात लावणीच्या कामात व्यग्र आहेत. भात लावणीची कामे अखेरच्या टप्प्यात आहेत. या कामासाठी मजूर मिळणे सध्या अवघड झाले आहे. शिवाय मजुरी देखील वाढली आहे. अशावेळी सारे कुटुंबातील सदस्य तसेच शहरात गेलेले चाकरमानी खास लावणीसाठी येऊन लावणीच्या कामात गुंतले आहेत. काही ठिकाणी भात लावणीचा इव्हेंटदेखील साजरा केला जात आहे.

शेतकरी लावणीची कामे पूर्ण करण्यासाठी अदिवासीवाडी व गावा गावात जाऊन मजूर शोधण्यासाठी फिरत आहे. मात्र अनेक आदिवासी कुटुंब रोजगारासाठी स्थलांतर झाल्यामुळे मजूर मिळणे कठीण झाले आहे. तर ज्याच्याकडे बैल जोडी नाही त्यांना दुसऱ्याच्या भरवशावर आपल्या लावणी साठी प्रतीक्षा करावी लागत आहे. मग काय शेतकरी राजाने आपल्या कुटुंबातील व नात्यातील मंडळींना घेऊन भात लावणीच्या कामास सुरुवात केली आहे.

अनेक कृषी पर्यटका तसेच प्रयोगशील शेतकरी शहरातील नागरिकांना तसेच होतकरू तरुणांना शेतीच्या कामांमध्ये सहभागी करून घेतात. भात लावणीचा इव्हेंटच तिथे होतो. सुधागड तालुक्यातील उद्धर येथील प्रयोगशील शेतकरी व कृषी पर्यटन चालविणारे तुषार केळकर यांनी आपल्या आत्मतृप्ती या कृषी पर्यटन केंद्रावर भात लावणीचा इव्हेंट झाला. यामध्ये भाताची शेती कशी होते. कोणत्या जातीचा भात आहे, या सगळ्याची शास्त्रशुद्ध माहिती देऊन भात लावणी कशी करावी हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्यात आले. भात लावणी बरोबरच उपस्थितांनी मढ बाथचा म्हणजे चिखलातील आंघोळीचा आनंद देखील घेतला. तसेच ट्रॅक्टर सफारी, नदी व धबधब्यावर आंघोळ, गावाची सफर आदी उपक्रम यावेळी राबवण्यात आले. शहरातील अनेक तरुण व नागरिकांनी या इव्हेंटमध्ये सहभाग घेऊन भात लावणी करत मजा केली. घरगुती जेवणाची चव देखील चाखली. अशा प्रकारच्या इव्हेंटमुळे स्थानिक तरुण प्रयोगाशील शेतकऱ्यांना चांगला रोजगागदेखील उपलब्ध होत आहे. त्यामुळे अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत, असे तुषार केळकर यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी भातलावणी हा जणूकाही एक स्नेह मेळावाच असतो. पावसाळ्यात हिरवाईने नटलेल्या डोंगरदऱ्यांच्या कुशीत असलेल्या शेतांमध्ये सुरू असलेली भातलावणी म्हणजे आंनद सोहळाच असतो. दुपारचे जेवण सोबत घेऊन सकाळी लवकर कुटुंब शेताकडे रवाना होते. भर पावसात वेगाने भातलावणी करण्याचे त्यांनी ठरवलेले असते. या वेळी मनोरंजनासाठी महिला गावाकडची जुनी पारंपरिक गाणी, ओव्या मतसेच धावलारी भातलावणी करतात. पुरुष मंडळी त्यांना दाद तर देतातच, अन् कधी कधी गाण्याचीही साथ देतात. दुपारच्या जेवणानंतरही सूर्यास्तापर्यंत हा उपक्रम सुरू असतो. बच्चेकंपनी सुद्धा भात लावणीच्या कामात गुंतते.

कुटुंबासमवेत भात लावणी म्हणजे एक पर्वणीच आहे. दरवर्षी या क्षणाची वाट पाहत असते. सध्या शेतमजूर मिळणे कठीण झाले आहे. शिवाय मजुरी देखील वाढली आहे. त्यामुळे नातेवाईक व कुटुंबीयांना घेऊन भात लावणी करते, यावेळी खूप गप्पागोष्टी व मौज मस्ती असते. घरातील लहानगे देखील मोठ्या उत्साहात या भात लावणी मध्ये सहभागी होतात, त्यामुळे शेतीचे महत्त्वदेखील त्यांना कळते, असे पुई येथील शेतकरी निहारिका शिर्के हिने सांगितले.

# हिंदी नाटककार जगदीशचंद्र माथुर

आधुनिक हिंदी नाटककार व एकांकिका लेखक जगदीशचंद्र माथुर यांचा जन्म शाहजहानपूर (उत्तर प्रदेश) येथे १६ जुलै १९१७ रोजी अलाहाबाद विद्यापीठातून एम. ए. झाल्यानंतर ते आय.सी.एस. झाले. बराच काळ आकाशवाणीवर ते महासंचालक म्हणून होते. संगीत-नाटक अकादेमीचेही ते सदस्य होते.

वयाच्या बाराव्या वर्षापासूनच त्यांनी लेखनास आरंभ केला. १९३६ मध्ये त्यांची पहिली एकांकिका 'मेरी बांसुरी' रंगभूमीवर आली आणि लगेचच ती सरस्वती नियतकालिकातून प्रसिद्धही झाली. भोर का तारा (१९४६) हा त्यांचा पहिला गाजलेला एकांकिकासंग्रह. नंतर १९५६मध्ये त्यांचा ओ मेरे सपने हा एकांकिकासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांच्या काही एकांकिका



आकाशवाणीवरूनही प्रसृत करण्यात आल्या.

कोणार्क (१९५०), कुंवरसिंह की टेक (१९५५), आशादीप (१९५६), शारदीया (१९५९) आणि पहला राजा (१९६९) ही त्यांची गाजलेली दर्जेदार नाटके होत. पहला राजा हे त्यांचे प्रतीकात्मक नाटक असून ते पृथू ह्या पौराणिक व्यक्ति रेखेवर आधारलेले आहे. त्यातून आधुनिक काळाला उचित असे विचार व्यक्त झाले आहेत. त्यांच्या एकांकिका व नाटकांतून सामाजिक वास्तवाचे तसेच विविध सामाजिक समस्यांचे व्यंग्यात्मक दर्शनही घडते. शारदीया नाटकात नवा प्रयोग आढळतो. या नाटकाचे कथानक दौलतराव शिंदे या मराठा वीराच्या जीवनातील प्रसंगावर आधारलेले आहे. भावनेची तीव्रता व प्रयोगक्षमता ही त्यांच्या नाट्यलेखनाची इतर वैशिष्ट्ये होत.

नाट्यलेखनाव्यतिरिक्त त्यांनी एक समदर्शी के अनुभव (१९५५) नावाने आपल्या आठवणी आणि दस तसविरें (दुसरी आवृ. १९६४) हा त्यांच्या आयुष्यात आलेल्या व त्यांना प्रभावित करणाऱ्या विविध क्षेत्रांतील दहा प्रसिद्ध व्यक्तींची शब्दचित्रे रेखाटणारा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचे दस तसविरेंचे स्थान विशेष महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांचे इतर ग्रंथ असे : दशरथनंदन (नाटक), रघुकुलरीति (नाटक), मेरे श्रेष्ठ रंग एकांकी (एकांकिकासंग्रह) व जिन्होंने जीना जाना (व्यक्तिपरिचय).

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# जिओ, एअरटेल, व्हीआयला करा बीएसएनएलमध्ये पोर्ट

जिओ, एअरटेल, आणि वोडाफोन आयडीया (व्हीआय) या देशातील तीन प्रमुख टेलिकॉम कंपन्या आहेत. जेव्हापासून या तीन खासगी कंपन्यांनी त्यांच्या रिचार्ज प्लॅनच्या किमती वाढवल्या आहेत, तेव्हापासून सरकारी टेलिकॉम कंपनी बीएसएनएल चांगलीच ॲक्टिव्ह झाली आहे.



ग्राहकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी बीएसएनएल स्वस्त रिचार्ज प्लॅन आणत आहे. त्यामुळे ग्राहकदेखील आता खासगी कंपन्यांकडून बीएसएनएलमध्ये पोर्ट करण्याचा विचार करत आहेत. तुम्हालाही बीएसएनएलवर स्विच करायचे असेल, तर ही बातमी तुमच्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

खासगी टेलिकॉम कंपन्यांनी आपल्या रिचार्ज प्लॅन्सच्या किमती वाढवल्यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळेच आता Jio, Airtel आणि Vi ;s अनेक ग्राहक बीएसएनएलकडे वळत आहेत.

या सरकारी टेलिकॉम कंपनीच्या स्वस्त रिचार्ज प्लॅनने मोठ्या प्रमाणात ग्राहकांना आकर्षित केले आहे. बीएसएनएलचा रिचार्ज प्लॅन इतर कंपन्यांच्या तुलनेत खूपच स्वस्त मानला जातो, ज्यांची व्हॅलिडिटी २८ दिवसांपासून ते ३६५ दिवसांपर्यंत असते.


नेटवर्कच्या बाबतीत बीएसएनएल खाजगी कंपन्यांपेक्षा कमकुवत असू शकते, परंतु कंपनी आपल्या स्वस्त प्लॅनद्वारे खासगी कंपन्यांशी स्पर्धा करत आहे. बीएसएनएल ज्या किमतीत रिचार्ज प्लॅन ऑफर करत आहे, त्याच्या जवळपास दुसरी कोणतीही कंपनी नाही.

तुम्हालाही बीएसएनएलमध्ये पोर्ट करायचे असेल, तर सर्वांत आधी तुम्हाला मेसेज बॉक्समध्ये 'PORT' लिहून तुमचा १० अंकी मोबाइल नंबर टाकावा लागेल आणि त्यानंतर स्पेस देऊन १९०० वर SMS पाठवून मोबाईल नंबर पोर्ट करण्याची विनंती करावी लागेल.

त्यानंतर तुमचा मोबाईल नंबर पोर्ट करण्यासाठी तुम्हाला बीएसएनएलच्या सेवा केंद्रावर जावे लागेल. तिथे आधार कार्ड किंवा इतर आयडी, फोटो आणि बायोमेट्रिकची माहिती घेतली जाईल. यानंतर तुम्हाला नवीन बीएसएनएल सिम जारी केले जाईल. त्या बदल्यात तुमच्याकडून काही पैसे आकारले जाऊ शकतात.

Jio आणि Airtel युजर्ससाठी बीएसएनएलवर पोर्ट करण्याची प्रक्रिया सारखीच आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाच्या नवीन नियमांनुसार, नवीन टेलिकॉम ऑपरेटरकडे जाण्यासाठी प्रतीक्षा कालावधी सात दिवसांचा झाला आहे. म्हणजे सिमकार्ड पोर्टसाठी सात दिवस लागतात.

# मराठी साहित्यिक वा. कृ. चोरघडे



**निमित्त**

प्रसिद्ध मराठी कथाकार वामन कृष्ण चोरघरे उर्फ वा.कृ. चोरघडे यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील नारखेड या गावी १६ जुलै १९१४ रोजी झाला. त्यांचे शिक्षण नागपूर येथेच झाले असून मराठी व अर्थशास्त्र हे दोन विषय घेऊन एम.ए. आणि बी.टी. या पदव्या मिळविल्यावर त्यांनी १९४९पर्यंत वर्धा येथील महाविद्यालयात अध्यापन केले. त्यानंतर काही काळ नागपूर येथील 'जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स' येथे उपप्राचार्य म्हणून काम केले. त्यानंतर 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'चे संचालक. नागपूर विद्यापीठात १९४६ ते ७० पर्यंत विद्यासभा, कार्यकारिणी आदी वीस समित्यांवर त्यांनी काम केले आहे. गांधीवादाचा त्यांच्या विचारावर प्रभाव असून १९४२ च्या आंदोलनात त्यांनी तुरुंगवासही भोगला.

१९३२मध्ये 'अम्मा' ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. त्यानंतर पारिजात, प्रतिभा, सत्यकथा, ज्योत्स्ना, कला इ. विविध वृत्तींच्या वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांनी प्रामुख्याने कथालेखन केले. सुषमा (१९३६) हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यानंतर हवन (१९३८),यौवन (१९४१),प्रस्थान (१९४५),पाथेय (१९४६),संस्कार (१९५०), प्रदीप (१९५४),ओंजळ (१९५७), मजल (१९६३), बेला (१९६४), ख्याल (१९७३) इ. त्यांचे अन्य कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

चोरघडे स्वतःस जीवनाचे उपासक समजतात, तथापि 'कलेसाठी कला' या भूमिकेचा त्यांनी पुरस्कार केला आहे. आत्मप्रकटीकरणासाठी कथा हेच माध्यम त्यांना आवडते. चोरघडे हे फडके-खांडेकर युगातील कथा आणि नवकथा यांतील एक मोलाचा आणि महत्त्वाचा दुवा होत. काव्यात्म वृत्तीने लिहिलेली त्यांची कथा फडके-खांडेकर युगातील कथेला सांकेतिकतेच्या बंधनातून मुक्त करू शकली. जे भोगले तेच त्यांच्या कथेतून अवतरले. त्यांची कथा म्हणजे भावस्थितीचे क्षणचित्र होय. 'विहीर','घार','काचेची किमया','अतिथी देवो भव','संस्कार' इ. कथांतून स्वतःचे असे वेगळे विश्व त्यांनी उभे केले सामर्थ्य आहे. नव्या शैलीच्या त्यांच्या कथांत वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य आहे.

काळ बदलला आहे (१९४८) हा त्यांच्या संकीर्ण लेखांचा संग्रह असून काका कालेलकर, साने गुरुजी, नरकेसरी अभ्यंकर यांची चरित्रेही त्यांनी लिहिली आहेत. माधव सावंत ह्यांच्या सहकार्याने त्यांनी एक मराठी-हिंदुस्तानी कोश संपादित केला आहे (१९४३). त्यांच्या आजवरच्या स्वतंत्र, अनुवादित-संपादित ग्रंथांची संख्या ७४ इतकी आहे.

त्यांच्या प्रदीप आणि पाथेय ह्या कथासंग्रहांना मध्य प्रदेश शासन साहित्यपरिषदेचे पारितोषिक मिळाले (१९५४-५५). चोरघडे यांची कथा ह्या संग्रहास महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले (१९६१-६२). संपूर्ण चोरघडे ह्या संग्रहास १९६६ च्या प्रवासी वंग साहित्य संमेलनात 'युगांतर' पारितोषिक मिळाले. ह्याच ग्रंथास नागपूर विद्यापीठानेही सुवर्णपदक देऊन गौरविले (१९६७). **(साभार : इंटरनेट)**

## आरोग्य प्रहर



# भोपळ्याच्या बिया खाण्याचे फायदे वाचून व्हाल अवाक्!

भोपळ्याची भाजी लोक आवडीने खातात भोपळ्याची भाजी आरोग्यासाठी अनेक दृष्टीने फायदेशीर असते. भोपळ्यात बियाही असतात. ज्याचं सेवन करून आरोग्यालाही अनेक फायदे मिळतात. या बियांचं सेवन करून सगळ्यात मोठा फायदा म्हणजे तुम्ही कमी वयात म्हातारे दिसणार नाहीत. आज या बियांचे फायदे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

**चिंता कमी होते :** कामाचा वाढलेला ताण, फॅमिली आणि आर्थिक प्रेशर यामुळे लोक खूप टेंशनमध्ये राहतात. लोक वेगवेगळ्या कारणांनी आजकाल खूप टेंशन आणि डिप्रेशनमध्ये असतात. अशात मानसिक आरोग्य चांगलं ठेवण्यासाठी तुम्ही भोपळ्याच्या बियांचं सेवन करू शकता. कारण यात मॅग्नेशिअम असतं जे डोकं शांत करण्यास मदत करतं. त्याशिवाय भोपळ्याच्या बियांमधील झिंक आणि व्हिटॅमिन बी च्या माध्यमातून टेंशन दूर केलं जाऊ शकतं.

**झोप चांगली येईल :** बऱ्याच लोकांना रात्री कमी झोप येण्याची समस्या होते. अनेक प्रयत्न करूनही शांत झोप लोकांना मिळत नाही. त्यामुळे रात्रभर लोकांना जागत रहावं लागतं. अशात भोपळ्याच्या बियांच्या मदतीने तुम्ही झोप न येण्याची समस्या दूर करू शकता.

**इम्यूनिटी होईल बूस्ट :** कोरोना व्हायरस महामारीनंतर इम्यूनिटी बूस्ट करण्यावर खास जोर दिला जातो. ज्यामुळे संक्रमणापासून बचाव केला जाऊ शकतो. भोपळ्याच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई आढळून येतं ज्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**डायबिटीसमध्येही फायदेशीर :** डायबिटीसच्या रूग्णांनी भोपळ्याच्या बियांचं सेवन आवर्जून करावं. कारण यात भरपूर प्रमाणात फायबर असतं. ज्याने टाइप २ डायबिटीसमध्ये आराम मिळतो. या बियांमध्ये व्हिटॅमिन सी आढळून येतं. जे मधुमेहावर रामबाण उपाय मानलं जातं. याने ब्लड शुगर लेव्हल कंट्रोल करण्यास मदत मिळते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** भोपळ्याच्या बियांमध्ये कोलेजन असतं. कोलेजनमुळे हाडे आणखी मजबूत होतात. त्वचेचा लवचीकपणा वाढतो आणि यामुळे त्वचा आणखी तरूण आणि निरोगी दिसते.

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : पावसाने सोमवारी थोडी उसंत घेतल्याने मिळालेल्या वेळेत बच्चेकंपनी मैदानावर खेळताना दिसली.** (छाया : तन्वी पवार)

# महावितरणविरोधात कर्जतकर आक्रमक

## नो लाईट, नो बिल मोहिमेंतर्गत महामोर्चा

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वीजसमस्या वाढत आहेत. त्यामुळे ॲड. कैलास मोरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह 'नो लाईट नो बिल' अशी मोहीम हाती घेतली. त्यानुसार झालेल्या ग्राहकांच्या बैठकीत २० जुलै रोजी कर्जत महावितरण कंपनीवर मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धुवांधार पाऊस असतानाही बैठकीला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कर्जत तालुक्यात वीजप्रवाह सातत्याने खंडित होत असतो. याला कर्जतकर हैराण झाले. सामाजिक कार्यकर्ते कैलास मोरे यांनी पुढाकार घेऊन आयोजित केल्या बैठकीला धुवाधार पाऊस पडत असूनही वीजग्राहक मोठ्या प्रमाणात शनिमंदिर सभागृहात उपस्थित होते. या बैठकीत अनेक वीज ग्राहकांनी आपल्या आणि आपल्या परिसरातील समस्या मांडल्या. त्यात तालुक्यात आणखी एक वीज उपकेंद्र उमरोली परिसरात उभारण्यात यावे, अशी मागणी या बैठकीत समोर आली.

प्रास्ताविकात ॲड. कैलास मोरे यांनी, महावितरण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या आंदोलनाची दखल घ्यावी यासाठी ठोस भूमिका घ्यावी, असे आवाहन केले.



या वेळी निवेदन देण्यासाठी मोर्चा, साखळी उपोषण आणि त्यानंतर नो लाईट नो बील असे पर्याय सूचविले. अनेकांनी सुरुवातीला मोर्चा काढून अल्टीमेटम देऊन पुढील आंदोलन करण्याचे निश्चित करण्यात आले. कर्जत नगरपालिका क्षेत्रात मोठ्या फिडरची आवश्यकता आहे. या चोरीला एमएसईबी जबाबदार आहे. नो बीलमध्ये मीटर केव्हाही कट करू शकतात. सामान्य माणूस या आंदोलनात सहभागी झाला तर हे आंदोलन यशस्वी होईल म्हणून तालुक्यातील सर्व वीज ग्राहकांनी या महा मोर्चाला उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. मोरे यांनी शेवटी केले.

या वेळी राजेश भगत, संकेत भासे, नितीन परमार, राजाभाऊ कोठारी, स्वप्नील पालकर, शर्वरी कांबळे, सोमनाथ ठोंबरे, सुरेश खानविलकर, विकास चित्ते, हरिश्चंद्र यादव, रंजन दातार, प्रशांत उगले, सोमनाथ पालकर, राजेश मिरकुटे, भावना पवार, रमाकांत जाधव, धर्मेंद्र मोरे, प्रभाकर गंगावणे, बिराज पाटकर, राजू पवार आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खालापुरात गुरे चोरण्याचा प्रयत्न फसला

## चोरटा पीकअप टेम्पो सोडून पसार

**खोपोली** : गुरे चोरून नेण्याचा चोरट्यांचा प्रयत्न खालापूर पोलिसांच्या सतर्कतेने फसला. चोरट्यांनी चोरलेली गुरे आणि पीकअप टेम्पो सोडून पळ काढला.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत शनिवारी संध्याकाळी ७ वा.च्या सुमारास सावरोली–खालापूर रस्त्यावर पिकअप टेम्पो (एमएच ०६ बीजी ४९७४) मधून गुरे चोरून नेत असल्याची माहिती खालापूर पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी नाकाबंदी करून पिकअप अडवली असता चालकाने पिकअप सोडून पळ काढला. पोलिसांनी पिकअपची तपासणी केली असता दोन गायी व एक वासरु कत्तलीसाठी घेऊन जात असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस हवालदार अमित सावंत करीत आहेत.

# पुरात वाहून गेलेल्याचा मृतदेह सापडला

**कर्जत** : तालुक्यातील डोणेवाडी येथील ५० वर्षीय आदिवासी बांधव शनिवारी सकाळी मुसळधार पावसामुळे आलेल्या महापुरात वाहून गेला होता. त्याचा मृतदेह सोमवारी (दि.१५) सकाळी बेंडसे गावाजवळ उल्हासनदीत आढळला.



गेले दोन दिवस प्रचंड पाऊस सुरू होता. गौरकामत ग्रामपंचायतीमधील डोणेवाडी वाडीमधील बाळू रतन पवार हे तब्येत बरी नसल्याने कडाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी निघाले होते. गौरकामत आणि जांभिवली गावाच्या मध्ये असलेल्या लहान ओढ्याला पावसामुळे भरपूर पाणी होते. त्या ओढ्यावरून वाट काढत असताना बाळू पवार वाहून गेल्याची शक्यता आहे. सोमवारी उल्हास नदीच्या तीरावर बेंडसे गावाच्या हद्दीत एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला. त्याची माहिती स्थानिक पोलीस पाटीलांनी कर्जत पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी मृतदेहाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले असता हा मृतदेह बाळू रतन पवार यांचा असल्याचे सिद्ध झाले. त्यानंतर कुटुंबीयांनी खात्री केल्यावर पंचनामा केल्यावर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.


**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि. रायगड,**
ई–निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२४–२५

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रुपये (उपकर व रॉयल्टी इ. कर अंतर्भूत) |
|---|---|---|
| १) | कोकण आपत्ती सौमीकरण प्रकल्पांतर्गत श्रीवर्धन ताल्युक्यातील खरसई खारभूमी योजना, कालसुरी खारभूमी योजना, तोंडसुरे खारभूमी योजना या योजनांच्या नुतनीकरणाचे काम. | ९,५४,९१,५५९/– |
| २) | कोकण आपत्ती सौमीकरण प्रकल्पांतर्गत अलिबाग ताल्युक्यातील वरसगांव खारभूमी योजना. भोनंग खारभूमी योजना, कोपरी चिखली खारभूमी योजना या योजनांच्या नुतनीकरणाचे काम. | २०,५९,९४,७८८/– |
| ३) | कोकण आपत्ती सौमीकरण प्रकल्पांतर्गत रोहा ताल्युक्यातील दिवखार खारभूमी योजना या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | १०,३७,५८,००७/– |
| ४ ) | कोकण आपत्ती सौमीकरण प्रकल्पांतर्गत मुरूड ताल्युक्यातील सोनखार जाफर खारभूमी योजना या योजनेच्या नुतनीकरणाचे काम. | १२,५७,२९,९११/– |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १६.०७.२०२४ ते ०५.०८.२०२४ पर्यंत
ई – निविदा उघडणे : दिनांक ०७.०८.२०२४.
सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास खालील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
http://mahatenders.gov.in

**सही/–**
**(रा. र. धाकतोडे)**
कार्यकारी अभियंता,
खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग,
पेण– रायगड.


# पशुचिकित्सा व्यवसाय संघटनेचे उपोषण स्थगित

## मागण्यांची पूर्तता करण्याचे सीईओंचे आश्वासन

**अलिबाग : प्रतिनिधी**

सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांचे आश्वासित पदोन्नती तसेच पशुधन पर्यवेक्षक पदावरून सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदोन्नती मिळावी, यासह इतर मागण्यांसाठी अलिबाग येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले होते, मात्र जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

पशुचिकित्सा व्यवसाय संघटनेच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांचे १०, २०, ३०च्या आश्वासित पदोन्नती तसेच पशुधन पर्यवेक्षक पदावरून सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदोन्नतीबाबत रायगड जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्याशी चर्चा करून एक वर्ष झाले, पण अद्याप कार्यवाही झालेली नाही. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी सुहास कांबळे यांचे निधन झाले. त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा प्रस्ताव अद्याप मंजूर झालेला नाही.

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ यांना प्रथमोपचार, खच्चीकरण, लसीकरण, कृत्रिमरेतन ही कामे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक करण्यासाठी दिलेली आहेत. त्याबाबत अद्याप मार्गदर्शन मिळाले नाही. या विभागातील अधिकारी, कर्मचारयांचे पगार वेळेवर होत नाहीत. अशा विविध प्रश्नांवर पशुचिकित्सा व्यवसाय संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू करण्यात आले.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शाम कदम यांनी आंदोलकांची भेट घेतली व मागण्यांचे निवेदन स्वीकारले, तसेच आंदोलकांचे शिष्टमंडळ मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांना भेटले.आठवडाभरात सर्व मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलकांनी समाधान व्यक्त करीत आंदोलन स्थगित करण्यात आले.




**Government of Maharashtra**
**Public Works Department P.W. Division, Panvel**
Telephone No. 022-27452778

**E-Tender Notice No. 11 (Open ONLINE)Year-2024-25**

E-mail address:- panvel.ee@mahapwd.gov.in
Fax Number :-022-27467440

Invitation of Request for Proposal (RFP) for Appointment of Private Architect, Structural Design Consultant and comprehensive Project Management Consultancy Services for 100 Bedded Sub District Hospital and Residential Quarters for Medical Officers and Staff at Uran Tal-Uran Dist-Raigad for selection of the Consultant to whom the Project may be awarded

The detailed Tender notice and Request for Proposal (RFP) can be viewed / downloaded from E-Procurement portal http://mahatenders.gov.in. The detailed notice can also be viewed on www.mahapwd.gov.in. The last date of submission of bid shall be on 23.07.2024.

The authority reserves the right to accept or rejected all/ any of the offers without assigning any reasons whatsoever. Conditional bid is not accepted.

**Sd/-**
**Executive Engineer**
P.W. Division, Panvel

आरओसी–२०२४–२५/क्र.–५/सी ८९३



**खोपोली नगरपरिषद**
**खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं. ४१० २०३**
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, फॅक्स :– ०२१९२–२६४२११
Email ID: cokmckhopoli@gmail.com

जा.क्र. केएमसी/जीइए/ईएसटी/४११ दिनांक : १५/०७/२०२४

खोपोली नगरपरिषद मिळ घनकचरा प्रकल्प केंद्र येथे कचऱ्याचे विघटन करून त्याचे सेंद्रिय खतामध्ये रुपांतर करण्यासाठी बायोकल्चर पावडर खेरीदी करणेकरिता मा. शासनाच्या जिल्हा दर सुची / राज्य दर सुच मध्ये हे दर मंजुर नसल्याने खालील बायोकल्चर पावडरचे दर हे पुरविणेकरीता सिलबंद लिफाफ्यामध्ये दर मागविणेंत येत आहेत.

सदरचे दर हे दिनांक १५/०७/२०२४ पासुन दिनांक २१/०७/२०२४ रोजी सायं. ४.३० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यातुन नगरपरिषद कार्यालयात द्यावेत.
तपशील खालीलप्रमाणे.

Quatation

| Item No. | Description of item | Quantity of Bioculture in k.g. to decompost 1 ton of waste | Per kg Rate (Bioculture) | Amount |
|---|---|---|---|---|
| 1) | Supplying Bioculture powder | | | |

**सही/–**
**(गौतम भगळे)**
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद


# कोथळीगडाच्या ढासळलेल्या बुरुजाची केली डागडुजी

## सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचा पुढाकार

**नेरळ : प्रतिनिधी**

जय शिवराय म्हणत कोथळीगडाच्या ढासळलेल्या बुरुजाची सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानकडून मोहीम फत्ते करण्यात आली.

मुंबई–पुणे रेल्वे मार्गावरील नेरळच्या पूर्वेला १९ किमीवर आणि कर्जतच्या ईशान्येला २२ किमीवर असलेल्या पेठ अंबिवली पुढे एका सुळक्यावर हा किल्ला आहे. किल्ला छोटा आहे पण पायथ्याची गुहा मोठी आहे. गुहेचे खांब मूळ पाषाणातून कोरून काढले आहेत. शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याचा उपयोग शस्त्रांचा साठा ठेवण्यास करीत असत. जोरदार पावसामुळे कोथळीगड (पेठचा किल्ला) येथील बुरुजाचा काही भाग ढासळला होता. त्यामुळे सह्याद्री प्रतिष्ठानच्या दुर्गसेवकांनी रविवारी (दि.१४) ही मोहीम फत्ते केली.

मोहिमेच्या सुरुवातीला गडपूजन करून बुरुजाचा ढासळलेला माती आणि दगडाचा भाग व्यवस्थित पुन्हा वापरता येईल अशा पद्धतीने रचून ठेवण्यात आला जेणेकरून पुन्हा पावसामुळे नुकसान होणार नाही.

दरम्यान गडावर प्रतिष्ठाणच्या माध्यमातून बसवलेले दरवाजे–तोफगाडे यांची शाकारणी करून अतिरिक्त वाढलेले गवत काढून टाकण्यात आले. मोहिमेचे नेतृत्व कर्जत विभागातील दुर्गसेवक सुरज खडे, भुषण बेलोसे, निरंजन ठाणगे, रितेश वायकर, हरेश मते, मिथिलेश म्हामुणकर, विनायक मराडे, प्रणव जंगम, रोहन म्हामुणकर, मयुर मते, अक्षय मते, सचिन धुळे, गणेश जाधव, अतुल घरत, समिर मराडे यांनी केले.




**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

पनवेल महानगरपालिकेचे मोबाईल ॲप व इ–कॉमर्स सेवा कार्यान्वित व प्रस्थापित करणेबाबत सदरकामी अंदाजपत्रक बनविणे करिता बाजारभाव मागविण्यात येत आहेत. तरी निविदाधारक यांनी नमूद कामाचे दर हे अंदाजपत्रक बनविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागात विहित मुदतीत जमा करण्यात यावे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील माहिती व तंत्रज्ञान विभागात उपलब्धआहे. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

मुदत :
पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.३११/३१२/२०२४
दिनांक : १५/०७/२०२४

**सही/–**
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त**
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – शिवकर, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७२ | ०–३२–७०<br>पो.ख. ०–०२–५०<br>**एकूण ०–३५–२०** | ७.४४ | श्री. मोरेश्वर बामा पाटील<br>श्री. भाऊ बामा पाटील<br>श्री. अनंत बामा पाटील<br>श्रीमती गुणाबाई चांगदेव केणी |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०३ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १५/०७/२०२४.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३/२०२४-२०२५ (मुंबई)
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्र या अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात विविध ठिकाणी पोर्टेबल मेटल केबिन उपलब्ध करून देणे. | ₹ २२,४६,४९०.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्र.... रस्त्याची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रातील गंगा नाल्यातील गाळ काढून नाल्याची साफसफाई करणे. | ₹ ८,६६,०९०.०० |
| ३ | महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमण काढण्यासाठी यंत्रसामग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. | ₹ ३४,७४,६६०.०० |
| ४ | गेल पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... (ठेव अंशदान काम)... कुरुल बूस्टर पंप हाऊसमधील पंपाचे परिचालन करण्याकरीता दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीसाठी सेवा पुरविणे. | ₹ १८,९१,४३०.०० |
| ५ | पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... जलशुद्धीकरण केंद्रातील फ्लॅश मिक्सर, स्टिरर व ॲक्सेसरीज बदलणे. | ₹ ३९,२५,३३५.०० |
| ६ | पाताळगंगा येथील नवीन व जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र व मऔवि महामंडळाच्या कर्मचारी वसाहतीमधील पाणी पुरवठा नेटवर्कचे अपग्रेडेशन करणे. | ₹ ३५,४५,२३१.०० |
| ७ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अभियांत्रिकी विभागामधील आरसीसी बिल्ट-अप गटरची साफसफाई यांत्रिक उपकरणांचा वापर करून करणे. | ₹ ३९,०७,०७६.०० |
| ८ | रोहा येथील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. कुंभोशी गावाजवळ कुंडलिका नदीतील ६३० मि.मी. व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी निःसारण वाहिनीच्या साखळी क्र. १२१० मि. येथील पाण्याच्या अंतर्गत गळती आपत्कालीन स्थितीत अटेंड करणे. | ₹ ३८,६७,०००.०० |
| ९ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील नाल्याची व रस्त्याच्या कडेच्या गटरची पावसाळ्या पुर्वी साफसफाई करणे. | ₹ ३९,६०,६९५.०० |
| १० | पाताळगंगा येथील नवीन व जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील लॉन व झुडूपांच्या बेडची एका वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर देखभाल करणे. | ₹ ३७,५६,१७६.०० |
| ११ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राजवळील मोकळ्या भूखंडाला कुंपण घालणे. | ₹ १०,१२,८८३.०० |
| १२ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा येथील शुद्ध व अशुद्ध जलउदंचन केंद्रातील २५० अश्वशक्ती पंपाची दुरुस्ती करणे. | ₹ ४०,२६,८००.०० |
| १३ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ई-आराखड्यातील पंप हाऊस व एचएसआरच्या परिचलनाकरीता सेवा पुरविणे. | ₹ १७,९३,४९६.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १६/०७/२०२४ ते दिनांक ३०/०७/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १९/०७/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २४/०७/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# महामार्गावरील गटारांची झाकणे तुटली

## सानपाडा येथील उड्डाणपुलाखाली अपघाताचा धोका





**नवी मुंबई : बातमीदार**

सायन-पनवेल महामार्गावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा सुरू असते. या मार्गावरील सानपाडा उड्डाणपुलाखालील गटारांची लोखंडी झाकणे तुटली आहेत. त्यावरील सळ्या तुटून गटार उघडे झाले आहे. यामुळे ती उघडी पडली असून, अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

मोटरसायकलचे अथवा रिक्षाचे चाक अडकून अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप वाहनचालक करत आहेत. याबाबत सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी आवाज उठवला आहे.

सायन-पनवेल महामार्ग सर्वाधिक वर्दळ असलेला मार्ग समजला जातो. मात्र या महामार्गावर मोठा अपघात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाने होण्याची शक्यता आहे. या मार्गावर सानपाडा उड्डाण पुलाखाली गटाराच्या लोखंडी झाकणांची वाताहत झाली आहे. झाकणे तुटली आहेत तर काही सळ्यादेखील निघाल्या आहेत. मुख्य म्हणजे ही झाकणे रस्त्याच्या कडेला आहेत. महामार्गावरून लहान वाहने रस्त्याच्या कडेने गाड्या चालवत असतात. बाईकस्वार हमखास वाहने रस्त्याच्या कडेने चालवतात. या तुटलेल्या झाकणात बाईक, रिक्षाचे चाक अडकून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्यास सर्वस्वी जबाबदार बेजबाबदारपणे वागणारे सार्वजनिक बांधकाम विभाग राहणार आहे.

सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने महामार्गाचे रुंदीकरण केले असून, ठिकठिकाणी उड्डाणपूल विकसित केले आहेत, परंतु महामार्गाची स्वच्छता होत नसून देखभाल दुरुस्तीकडेदेखील दुर्लक्ष झाल्याने वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. संबधित प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत शासन अपघाताची वाट पाहत आहे का, असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी विचारला आहे.

# 'त्या' महिलेच्या आरोपींना उचित शिक्षा व्हावी -निलम गोऱ्हे

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यात असलेले शिळगावात नवी मुंबई बेलापूर येथे राहणाऱ्या एका ३० वर्षीय महिलेवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या केल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी ९ जुलै २०२४ रोजी उघडकीस आली. शिळगावातील घोळ गणपती मंदिरातील तीन पुजाऱ्यांनी एका विवाहितेवर सामूहिक अत्याचार करून हत्या केल्याची ही घटना घडली आहे. घटनेतील आरोपीना उचित शिक्षा व्हावी याकरीता विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करावी, अशी मागणी या वेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.



महिलांना सर्व क्षेत्रात प्राधान्य देणे व त्यांचा सर्वांगीण विकास साध्य करणे हे या सरकारचे धोरण आहे. अशा परिस्थितीत ही घटना या स्त्रियांच्या मनोधैर्यावर विपरीत परीणाम करू शकतात. मंदिर परिसरात आरोपींनी एका विवाहीत महिलेवर सामूहिक अत्याचार केले. ही घटना अत्यंत लाजीरवाणी व माणुसकीला काळीमा फासणारी असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी म्हटले आहे. अशा घटना भविष्यात घडु नये याकरीता राज्यातील सर्व मंदिरे, प्रार्थनास्थळे येथे सीसीटीवी बसविण्यात यावे व तेथील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करावी.

धार्मिक स्थळामध्ये कार्यरत सर्व कर्मचारी, पुजारी व ईतर पूर्णवेळ सेवक यांची नजीकच्या पोलीस स्टेशनमार्फत चारित्र्य पडताळणी करण्यात यावी. तसेच महिलेचे आप्त व कुटुंबीयांना मानसोपचार सेवा व समुपदेशन पुरविण्यात यावे. व या घटनेतील आरोपींना उचित शिक्षा व्हावी याकरीता विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करावी, अशी सूचना या वेळी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्राद्वारे केली आहे.

# घंटागाडी आणि साफसफाई कर्मचाऱ्यांच्या पीएफचा प्रश्न मार्गी

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण हे संस्थापक सल्लागार असलेल्या शिवसेनाप्रणित शिवप्रेरणा श्रमिक कामगार संघटना या कामगार युनियनच्या पाठपुराव्याने घंटागाडी व साफसफाई कामगारांचा २०१८ ते २०२१ या कालावधीतील अडकलेला तब्बल साठ लाख रुपये पीएफ ११०हुन अधिक कामगारांच्या खात्यात जमा झाला आहे.

हे सर्व कामगार कंत्राटी स्वरूपात पनवेल महापालिकेमध्ये स्वच्छता विभागात कार्यरत असून कंत्राटदार व महापालिका यांच्या ढिसाळ कारभारामुळे तब्बल तीन वर्षांचा भविष्य निर्वाह निधी कामगारांना मिळालाच नव्हता. या कामगारांचा पीएफ वेतन मधून कपात करूनही त्यांच्या खात्यात जमा करण्यात आला नव्हता. शिवसेनेचे प्रथमेश सोमण यांनी या प्रकरणाचा महापालिका व कंत्राटदाराकडे प्रचंड पाठपुरावा केला. कामगार आयुक्तालयात कायदेशीर लढाईदेखील लढली व अखेरीस तब्बल चार वर्षांनी हा मागील वर्षांचा अडकलेला पीएफ कामगारांच्या खात्यात जमा करण्यात आला.

एवढी मोठी रक्कम इतक्या वर्षाने कामगारांना त्यांच्या खात्यात बघून संघर्ष यशस्वी झाल्याचे समाधान वाटले. एवढी मोठी रक्कम आम्हा गरीब कामगारांना मिळाली अशी भावना संघटनेचे अध्यक्ष अनित कुमार गागडा यांनी व्यक्त केली, तर संघर्ष करावा लागला तरीही जुना कंत्राटदार व महापालिकेचे अधिकारी यांनी अखेरीस आवश्यक ते सहकार्य केल्यामुळे कामगारांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळाले असे म्हणून महापालिका प्रशासनाचे, कंत्राट दाराचे व संघर्षात साथ दिलेल्या सर्व कामगारांचे प्रथमेश सोमण यांनी आभार मानले.

# एन्व्हायरमेंट फाउंडेशनकडून स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

एन्व्हायरमेंट लाईफ फाउंडेशन या संस्थेकडून सातत्याने दर रविवारी स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. पाऊस असो वा थंडी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष धर्मेश बराई हे कायम ही स्वच्छता मोहीम राबवत असतात. कांदळवन जगवणे, त्यांचे संवर्धन करणे व स्वच्छता राखणे हे मुळ उद्देश या मोहिमेचे आहेत. या रविवारी (दि. १४) देखील ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा हा २०४ वा आठवडा होता. मँग्रोव्ह क्लीन-अप ड्राईव्हमध्ये मँग्रोव्ह सैनिकांनी खूप मेहनत घेतली. नवी मुंबई पालिकेचे सहकार्य मिळाले आहे.

शनिवारी रात्रीपासून पाऊस कोसळत आहे. या कोसळणाऱ्या पावसात देखील करावे येथील कांदळवनात ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पाऊस कोसळत असला तरी, हळूहळू ५० पेक्षा जास्त जणांनी सहभाग नोंदवला. यात लहान मुलेदेखील होती. सर्वांनी मोठ्या उत्साहाने काम केले. या मोहिमेत एनएसएसच्या एसआयईएस कॉलेज, सरस्वती कॉलेज, तेरणा कॉलेज, आणि नवी मुंबई इनरव्हील क्लबच्या सदस्यानी यात सहभाग नोंदवला.

आम्ही २०४ आठवड्यांमध्ये ६०० टनांहून अधिक कचरा समुद्र आणि मँग्रोव्हमधून काढण्यात आला. ६० हजार पेक्षा जास्त लोक या मोहिमेत सहभागी झाले आहेत आणि योगदान देत असल्याचे धर्मेश बराई यांनी सांगितले.

नागरिकांनी कचरा खाडीत, नाल्यात टाकू नये. पालिकेच्या सूचनेनुसार ओला व सुका कचरा वेगळा करावा. आपल्या देशाला कचर्याचा डब्बा बनू देऊ नका. आपल्या कुटुंबातील आणि शेजाऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करा. कचरा फेकण्यापेक्षा त्याची स्वच्छता करण्यास प्रोत्साहित करा. स्वच्छ भारतासाठी आपण सर्वांनी योगदान देणं आवश्यक आहे. पर्यावरणाच्या समस्यांवर चर्चा करा. एकमेकांवर दोषारोपण करण्यापेक्षा समाधान शोधा. पर्यावरणाचं संरक्षण करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे, असे एन्व्हायरमेंट लाईफ फाउंडेशनचे संस्थापक धर्मेश बराई यांनी सांगितले.

# घणसोलीत शॉर्टसर्किटमुळे आग

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील घणसोली गावात असणाऱ्या बाळाराम वाडी येथे महावितरणाच्या रोहित्राला (ट्रान्सफॉर्मर) सोमवारी (दि. १५) सकाळी अचानक आग लागली. आग लागल्याने सुमारे दोन हजार घरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. अग्निशमन दलाच्या मदतीने आग विझवण्यात आली असून विद्युत प्रवाह सुरळीत होण्यास मात्र संध्याकाळ होणार आहे.

मान्सूनपूर्व कामाच्या नावाखाली महावितरणाने कित्येक तास वीज पुरवठा खंडित केला, मात्र जेव्हा प्रत्यक्षात मान्सून अर्थात पावसाळा सुरू झाला तेव्हा मात्र वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले. त्यात घणसोली कायम अग्रस्थानी आहे. घणसोली गावात वीज पुरवठा ही अनेक वर्षांपासून कायम समस्या असून त्यात सोमवारी सकाळी ९च्या सुमारास बाळाराम वाडीत असणाऱ्या रोहित्राला अचानक आग लागली. पावसाने जोर पकडल्याने पावसाच्या



पाण्याने शॉर्ट सर्किट होऊन आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज महावितरणाने व्यक्त केला आहे. आग लागल्याचे कळताच ऐरोली अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी आग विझवली.

या घटनेने सुमारे १८०० ते २००० घरातील वीज पुरवठा खंडित झाला असून सुरळीत होण्यास किमान चार ते पाच तास लागतील असे महावितरणद्वारे सांगण्यात आले. तात्पुरता इतर ठिकाणाहून वीज घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रोहित्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने ते काढून दुसरेच लावण्यात येणार आहे, अशी माहिती महावितरण अधिकाऱ्याने दिली.

# कल्याण-तळोजा मेट्रो रेल्वेमार्ग उभारणीला सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा परिसरातील गावालगत कल्याण-तळोजा मेट्रो रेल्वेमार्ग उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली असून, पिल्लर उभारणीसाठी खोदकाम करण्यात येत आहे. यामुळे तळोजा वसाहत लगत असलेल्या जमिनीच्या किमतीत मागील वर्षीपेक्षा दुप्पटीने वाढ झाली आहे. मेट्रो रेल्वेस्थानक लगत असलेल्या जमिनी मिळविण्यासाठी बांधकाम व्यावसायिक दलालांच्या माध्यमातून प्रयत्न करीत असल्याचे ग्रामस्थांकडून समजते.

कल्याण, डोंबिवली या शहरांना थेट नवी मुंबई शहराशी जोडणाऱ्या कल्याण-



तळोजा मेट्रो रेल्वे मार्गाच्या कामाला सुरुवात झाली आहे. तळोजा परिसरातील मेट्रो मार्गात पिल्लर उभारणीसाठी मशीनद्वारे खोदकाम करण्यात येत आहे. कल्याण-तळोजा मेट्रो मार्गामुळे तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई आणि पनवेल परिसरात व्यवसाय तसेच नोकरी करणाऱ्यांचा प्रवास सुखकर आणि कमी वेळेत होणार आहे.

कल्याण-तळोजा मेट्रो मार्गामध्ये तळोजा वसाहतीलगत असलेल्या बाळे, वाकलन, तुर्भे, पिसार्वे, धानसर, पिसावे, बाम्मली आणि नर्हेन आदी गावांचा समावेश आहे. या गावातील ग्रामस्थांचा शेती हाच एकमेव व्यवसाय आहे. पावसाळ्यात भातशेती तर काही ग्रामस्थ हिवाळा आणि उन्हाळ्यात भाजीपाला लागवड करून उदरनिर्वाह करतात, मात्र गेल्या काही वर्षात वाढत्या प्रदूषणामुळे शेती आणि भाजीपाला व्यवसाय मोडीत निघाला आहे. मागील वर्षी ११ ते १२ लाख रुपये गुंठा दराने विक्री होत असलेल्या जमिनीचे दर सध्या १५ ते ३० लाख गुंठा असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे.

# दीपक कापसे यांना पुरस्कार जाहीर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील कोकुयो कॅमलीन कंपनीचे दीपक गंगाराम कापसे हे राष्ट्रहितासाठी गेली अनेक वर्षे अलौकिक कार्य करण्याचे कार्य करीत आहेत. या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

गुरुपोर्णिमानिमित्त इंटरनॅशनल इन्व्हार्मेंट मल्टीपरपोझ हुमन सर्व्हिस ऑर्गनायझेशन इंडिया, समृध्दी पब्लिकेशन व सम्यक सामाजिक संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथे एकात्मता गौरव संमेलनात सुप्रसिध्द सिने अभिनेते मिलिंद गवळी, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष



मेघराज राजेभोसले, चित्रपट अभिनेते जाकीर खान, चित्रपट निर्माती नेहा धुरी यांच्याहस्ते रविवारी (दि. २१) मराठी ग्रंथ संग्रहालयात दिपक गंगाराम कापसे यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराने गोरविण्यात येणार आहे. दीपक कापसे यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विद्यार्थ्यांना वह्या आणि ज्येष्ठांना छत्र्यांचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना उपनेते तथा विजय नाहटा फाउंडेशनचे अध्यक्ष विजय नाहटा यांच्या हस्ते सेक्टर ६ सारसोळे नेरुळ येथील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

गेल्या महिनाभरापासून बेलापूर विधानसभा क्षेत्रात विजय नाहटा फाउंडेशनच्या वतीने स्वस्त दरात कांदा वाटप, नाका कामगारांना रेनकोट वाटप, विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप, तरुणांना टी शर्टचे वाटप, जेष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप, अशा विविध वस्तूंचे लाखोंच्या संख्येत वाटप करून नागरिकांची सेवा करण्याचे कार्य विजय नाहटा फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू आहे.



याचाच एक भाग म्हणून सेक्टर ६ सारसोळे नेरुळ येथे वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम उपजिल्हा प्रमुख गणपत शेलार यांच्या नियोजनातून करण्यात आला होता.

या वेळी उपजिल्हा प्रमुख गणपत शेलार, दिलीप घोडेकर, शहर प्रमुख विजय माने, उपशहर प्रमुख श्याम म्हात्रे, दिलीप आमले आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# मॉडर्न स्कूलमध्ये वृक्षदिंडी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियानांतर्गत वाशी येथील मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडी काढून जनजागृती केली. पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी माझी वसुंधरा (माय अर्थ) हा अभिनव उपक्रम शासनाने हाती घेतला आहे.

हा उपक्रम निसर्गाच्या पंचमहाभूते नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रित करतो. त्यात भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) यांचा समावेश आहे. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक केले जाते. याच अभियानाचा एक भाग म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलमधील विद्यार्थ्यांनी सोमवारी १५ जुलैला शाळेच्या परिसरात वृक्षदिंडी काढून झाडे लावण्यासंदर्भात जनजागृती केली. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी झाडांचे संवर्धन करण्याची शपथ घेऊन शाळेच्या आवारात वृक्षारोपण केले.

या अभियानामध्ये विद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले, पर्यवेक्षक आबासाहेब वाघ, शिक्षक, विद्यालयाच्या इंग्रजी तसेच मराठी माध्यमाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

# सिडकोतर्फे उद्योग, हॉटेलकरिता भूखंड आणि दुकानांची भव्य योजना

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये निवासी, बंगला, निवासी तथा वाणिज्यिक, वाणिज्यिक, सेवा उद्योग आणि स्टार हॉटेल वापराकरिता ४८ भूखंडांसह सिडकोच्या गृहनिर्माण संकुलांतील २१८ दुकानांच्या विक्रीची भव्य योजना सादर करण्यात आली आहे. भूखंड विक्री योजनेच्या ऑनलाइन नोंदणीस ६ जुलै २०२४ पासून सुरुवात झाली आहे. तर दुकान विक्री योजनेच्या ऑनलाइन नोंदणीस १६ जुलै २०२४ पासून सुरुवात होणार आहे.

सिडकोतर्फे सातत्याने राबवण्यात आलेल्या निवासी व वाणिज्यिक भूखंड, दुकाने, वाणिज्यिक जागा यांच्या विक्री योजनांना नागरिक, व्यावसायिक, विकासक इ. घटकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

या वेळी सिडकोतर्फे नवी मुंबईच्या घणसोली, नेरूळ, सीबीडी बेलापूर, खारघर, कोपरखैरणे, कळंबोली, पनवेल (पू.) आणि पनवेल (प.) नोडमधील निवासी, बंगला, निवासी तथा वाणिज्यिक, वाणिज्यिक, सेवा



उद्योग आणि स्टार हॉटेल वापराकरिताचे ४८ भूखंड ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेकरिता https://eauction.cidcoindia.com/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. योजनेकरिता ऑनलाइन नोंदणीचा कालावधी ८ जुलै २०२४ ते २३ जुलै २०२४ आहे. योजनेचा निकाल २५ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात येईल.

तसेच सिडकोच्या स्वप्नपूर्ती गृहसंकुलासह नवी मुंबईतील तळोजा, कळंबोली, घणसोली, खारघर आणि द्रोणागिरी नोडमधील गृहसंकुलांतील २१८ दुकाने ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेद्वारे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ई-निविदा तथा ई-लिलाव प्रक्रियेकरिता https://eauction.cidcoindia.com/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. योजनेच्या ऑनलाईन नोंदणीस १६ जुलै २०२४ पासून सुरुवात होणार आहे. योजनेचा निकाल २० ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

> *या योजनेमध्ये सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईसारख्या शहरात स्वत:चे मनपसंत घर (बंगला) बांधण्याची सुवर्णसंधी लाभली आहे. तसेच दुकान विक्रीच्या योजनेतून बांधकाम व्यावसायिक, उद्योजक, लघु व मध्यम व्यावसायिक या घटकांनाही आपल्या व्यवसाय वाढीची उत्तम संधी लाभली आहे.*
>
> **-विजय सिंघल,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

या योजनांतील भूखंड आणि दुकाने असणारी गृहसंकले नवी मुंबईतील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी व वेगाने विकसित होणाऱ्या नोडमध्ये आहेत. योजनेतील भूखंड हे सर्व पायाभूत सुविधांनी सुसज्ज आहेत. तसेच गृहसंकुलांचा परिसर हा सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण आहे. महामार्ग, मेट्रो, रेल्वे यांद्वारे या भूखंडांना आणि गृहसंकुलांना उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे तसेच सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी या महत्त्वाच्या ठिकाणांपासूनही हा परिसर नजीकच्या अंतरावर आहे.

भूखंड विक्रीच्या योजनेद्वारे बांधकाम विकासकांसह सर्वसामान्य नागरिकांनाही आपल्या स्वप्नातील घर नवी मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरामध्ये साकारण्याची संधी मिळणार आहे. या योजनेंतर्गत लहान, मध्यम व मोठ्या क्षेत्रफळांचे भूखंड उपलब्ध आहेत तसेच वाणिज्यिक, सेवा उद्योग आणि स्टार हॉटेल भूखंडांमुळे शहरातील वाणिज्यिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. स्वप्नपूर्तीसह सिडकोच्या विविध गृहसंकुलांतील दुकानांद्वारे लघु व मध्यम व्यावसायिकांना नवी मुंबईमध्ये व्यवसाय वृद्धीची संधी उपलब्ध होणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# कुकशेत गावात रंगणार आषाढी एकादशीचा सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवीन कुकशेत देवस्थान समिती व कुकशेत ग्रामस्थांच्या वतीने बुधवारी (दि. १७) कुकशेत गावामध्ये आषाढी एकादशी सोहळ्याचे आयोजन केले आहे. सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यत विविध कार्यक्रमाचे आषाढी एकादशीनिमित्त आयोजनही या सोहळ्यात करण्यात आले आहे.

कुकशेत गावातील भुखंड क्रमांक ५-पी वरील विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ६ वाजता विठुरायाचे भजन व अभिषेक होणार आहे. विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यत विठ्ठल दर्शन व फराळाचा भाविकांना लाभ घेता येणार असल्याची माहिती कुकशेत गावच्या माजी नगरसेविक सुजाता पाटील व माजी नगरसेवक सूरज पाटील यांनी दिली आहे.

कामातील व्यस्ततेमुळे अनेक भाविकांना इच्छा असूनही पंढरपुरी जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेणे शक्य होत नसल्याने नेरूळ नोडमधील भाविकांनी मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन नवीन कुकशेत देवस्थान समिती व कुकशेत ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

निवडक



## श्री स्वामी समर्थ मठातर्फे वृक्षारोपण

**मुरुड** : श्री स्वामी समर्थ मठ डोंगरीतर्फे गावाच्या सुमारे दीड किमी डोंगराळ व रस्त्यालगतच्या भागात वृक्षलागवड करण्यात आली. मठाधिपती त्रिशा दत्तात्रय भोसले-पाटील यांच्या संकल्पनेतून उपक्रम राबविण्यात आला. औषधी व फळझाडे तसेच आयुर्वेदिक वृक्ष लावण्यात आली. प्रत्येक वृक्षाभोवती लोखंडी जाळी बसवण्यात आली आहे. असे एकूण ८० वृक्ष डोंगरी परिसरात लावण्यात आली. या वेळी डॉ. दतात्रेय पाटील, राजपुरी उपसरपंच इस्माईल सिद्दिक, हसमुख जैन, महात्मा फुले पतसंस्थेचे चेरमन अजित गुरव, मेहुल शहा, भारत डोंगरीकर, अरविंद पाटील आदी उपस्थित होते.


## लोहारे पवारवाडीत आंबा कलम वाटप



**पोलादपूर** : तालुक्यातील लोहारे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील पवारवाडी येथील श्रीलक्ष्मीनारायण मंदिराच्या सभागृहामध्ये आपले कोकण प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई यांच्या संलग्न उपक्रमातून आंबा कलम वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य निवास शेठ उपस्थित होते. या वेळी व्यासपिठावर आपले कोकण प्रतिष्ठानसह विविध संघटनांचे पदाधिकारी बबन शेलार, प्राथमिक शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे, जिल्हाध्यक्ष विजय पवार, संपादक आमीर तारलेकर, पत्रकार शैलेश पालकर, लोहारे सरपंच दिपक पवार, उपसरपंच संदेश नरे, माजी सरपंच किसन पारकर, माजी सरपंच शिवराम पवार, समाजसेवक रंजन नरे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईच्या पोलादपूर सचिव व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्या प्रिती बुटाला व ग्रामपंचायत सदस्या सुषमा पवार आदी उपस्थित होते. लोहारे पवारवाडी गावातील प्रत्येक कुटूंबाला एक याप्रमाणे एक आंबा कलमाचे रोप मोफत भेट देण्यात आले.

## पीआय प्रसाद पांढरेंना राष्ट्रपती पुरस्कार

**पेण** : तालुक्यातील वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद



पांढरे यांना राष्ट्रपती पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. १९५६मध्ये पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्त झालेल्या प्रसाद पांढरे यांनी मुंबई पोलीस दलात क्राईम ब्रांच, अँटी नार्कोटिक्स सेल अशा महत्त्वाच्या ठिकाणी काम केले आहे. गोंदिया येथे नक्षल क्षेत्रामध्येसुद्धा ते कार्यरत होते. ठाणे ग्रामीण येथील मुरबाड पोलीस स्टेशन येथे प्रभारी अधिकारी म्हणून सेवा बजावून गेल्या चार महिन्यांपूर्वी वडखळ पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. पोलीस निरीक्षक पांढरे यांनी महाराष्ट्र पोलीस सेवेत आल्यापासून आतापर्यंत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल वडखळ पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# म्हसळा तालुक्यात पावसाची संततधार

## भातलावणी झाली ७० टक्के पार; ७५० हेक्टरवर लागवड

**म्हसळा : प्रतिनिधी**

राज्यात सर्वत्र पावसाचा जोर कायम आसतानाच पावसामुळे नदी, नाल्यांना पूर आला आहे. रायगड जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू आहे. म्हसळा तालुक्यात १०६.०४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. भातलावणीसाठी पुरेसा पाऊस झाल्यामुळे तालुक्यात लावणीच्या कामांना वेग आला आहे. ६० ते ७० टक्के शेतकऱ्यांची भातलावणीची कामे पूर्ण झाली आहेत. त्याचप्रमाणे धरणेही भरल्याने पाणीटंचाई दूर होणार आहे.



तालुक्यात एकूण १३५० हेक्टरवर भातशेती आहे. त्यापैकी या वर्षी अंदाजे ७५० हेक्टरवर लागवड झाली आहे. तालुक्यामध्ये नाचणीचे क्षेत्र २६० हेक्टर आहे. नाचणी लागवडीचे कामही अंतिम टप्प्यात आहे.

शेतात चिखल करीत शेतकऱ्यांची भातलावणीची लगबग सुरू आहे. भातलावणी करताना ओले चिंब अंग आणि लावणीचे श्रम विसरण्यासाठी महिला कामगारांतून वेगवेगळ्या गीतांचे स्वर ऐकू येत आहेत.

मागील आठवड्यापासून अत्यंत समाधानकारक पाऊस पडत आसल्याने नाचणी, वरी लावणीलासुद्धा वेग आला आहे. मौजे काळसुरी, आडीठाकूर-पाष्टी तालुक्यात कृषी अधिकारी राजेंद्र ढंगारे, कृषी पर्यवेक्षक सुजय कुसळकर, रामेश्वर मगर, कृषी सहाय्यक धनंजय सरनाईक काळसुरी, गणेश देवडे आंबेत, कल्पना शेळके यांनी आपापल्या कार्यक्षेत्रांत जाऊन शेतकऱ्यांना लावणी, पाणी निचरा पद्धत तसेच खत व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले.

पावसाच्या हजेरीने पाणीटंचाईदेखील दूर होणार आहे.

## तरणखोपमध्ये भंगार गोडाऊनला आग

### सुदैवाने जीवितहानी टळली

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील तरणखोप गावच्या हद्दीत रविवारी (दि.१४)पहाटेच्या सुमारास भंगार गोडाऊनला आग लागून भंगार जळून खाक झाले.

तारणखोप गावच्या हद्दीत असलेल्या हॉटेल शुभलक्ष्मीजवळ भंगाराचे गोडाऊन असून रविवारी पहाटेच्या सुमारास अचानक आग लागली. अपघातग्रस्तांना मदत करणारे कल्पेश ठाकूर व ग्रामस्थ या ठिकाणी हजर झाले. नगर परिषद व जेएसडब्ल्यू कंपनीच्या अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले. या



आगीत भंगारातील सामान जाळून खाक झाले. सुदैवाने जीवितहानी टळली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतिक पोकळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी अधिक तपास पोलीस हवालदार योगेश टेमकर हे करीत आहेत.

## वाहतूक पोलिसांची वाहनचालकांवर धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. रविवारी (दि.१४) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३६ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ३९ हजार ३०० रुपये इतका दंड आकारला आहे. या धडक कारवाईने चालकांचे धाबे दणाणले आहेत.

## रेल्वे समस्या सोडविण्यासाठी खासदार, आमदारांना साकडे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी खासदार श्रीरंग बारणे व आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन रेल्वे समस्यांचे निवेदन देऊन त्या तातडीने सोडविण्यासाठी साकडे घातले.

या निवेदनात कोरोनापूर्वी असलेल्या गाड्यांचा थांबा परत देणे, तसेच रद्द केलेल्या गाड्या सुरू करणे, कर्जत-कल्याण, कर्जत-ठाणे शटल सेवा सुरू करणे, रात्री १०.४५ नंतर कर्जत ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल सुरू करणे, कर्जत-खोपोली व कर्जत-सीएसटीदरम्यान जास्त गॅप असलेल्या मध्य लोकल गाड्या सुरू करणे, रॅम लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देणे, भुयारी मार्गाचे काम लवकर करणे, ज्येष्ठ नागरिकांची असलेली लांब पल्ल्याच्या गाड्यांची सवलत पुन्हा सुरू करणे, कर्जत येथे सगळ्याच एक्सप्रेस गाड्यांचा येता-जाता अधिकृत थांबा देणे, कर्जत-पनवेल शटल सेवा सुरू करणे, कोकणात जाणारी एकमेव असलेल्या एर्नाकुलम एक्सप्रेस या गाडीला कर्जतला थांबा देणे, कर्जतमधील सर्व प्लॅटफॉर्मला शेड असणे, आरक्षण खिडकीची वेळ वाढविणे, भिसेगाव येथील तिकीट खिडकीची वेळ वाढविणे, कर्जत स्थानकावर मध्यभागी पादचारी पूल बांधणे, शेलु, भिवपुरी, वांगणी व खोपोली येथे पोलीस चौकीची सुविधा करणे, कर्जतपर्यंत एसी लोकल आणणे, पळसदरी ते खोपोलीदरम्यान कॅमेरा बसण्याचे काम युद्धपातळीवर करणे, कर्जत रेल्वे स्थानकात अॅम्बुलन्सची सुविधा करणे या मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावर खासदार बारणे यांनी, या सर्व मागण्या सोडविणे हे माझे कर्तव्य असून त्या सोडविण्याचा मी कसोशीने प्रयत्न करीन, असे आश्वासन दिले.



**धाटाव : रोठ बुद्रुक ग्रामपंचायत भाजप उपसरपंच कै. वेदिका डाके यांच्या कुटुंबियांची उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांभेकर, रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, राजेश डाके, संकेत मोरे, हृषिकेश माने यांनी सांत्वनपर भेट घेतली.**

## वावंढळ नाक्यावर अवैध पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

**चौक** : वावंढळ नाक्यावर काही खासगी गाड्या अवैधरित्या पार्किंग करीत असल्याने इतर चालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अशा गाड्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

वावंढळ हे गाव जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर आहे. याच गावातून भिलवले, जुना गाव, भिलवले धरण, भिलवलेमार्गे कर्जत जाण्यासाठी रस्ता आहे. गावात शिरल्यावर काही जण गाड्या रस्त्याच्या कडेला उभ्या करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत ग्रामपंचायतीने कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

## लाडकी बहीण योजनेसाठी पेणमध्ये शिबिर घेण्याची मागणी

**पेण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेपासून पेण शहरातील गरजू महिला वंचित राहू नये म्हणून शहरातील प्रत्येक वार्डप्रमाणे दोन दिवसांचे शिबिर घ्यावे, अशी मागणी हरिष बेकावडे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली. याबाबत मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेऊन येत्या दोन दिवसांत दोन दिवसांचे कॅम्प लावण्याचे आश्वासन दिले आहे.

पेण शहरांमध्ये प्रामुख्याने जिथे गोरगरीब महिला राहतात त्यांना अजूनही याबाबत जनजागृती नाही. याबाबत सर्व महिलांनी आपले फॉर्म प्रत्येक वार्डातील नेमलेल्या ठिकाणी भरून घ्यावेत, तसेच ज्यांना शक्य होईल त्यांनी लवकरात लवकर स्वतः ऑनलाईन पद्धतीने हे फॉर्म भरल्यास आपणास त्या योजनेचा लाभ घेता येईल.

पेण तहसीलदारांमार्फत जर का अशा पद्धतीने व्यवस्था केलेली नसेल तर ग्रामसेवकांमार्फत अथवा तलाठ्यांमार्फत माझी लाडकी बहीण योजनेची माहिती ग्रामपंचायत पातळीवर देऊन वंचित महिलांचे फॉर्म भरून घेण्यास सहकार्य करावे, तसेच तालुक्यातील सर्व नागरिकांनी याची गावपातळीवर जनजागृती करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## शिक्षणाचा उपयोग मानव कल्याणासाठी करा -उल्हासराव देशमुख



**चौक : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग मानव कल्याणासाठी करावा, असे आवाहन देशमुख मराठा समाजाचे संस्थापक अध्यक्ष उल्हासराव देशमुख यांनी केले.

खालापूर तालुका देशमुख मराठा मंडळाच्या वतीने गुणवान विद्यार्थी आणि विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळविलेल्या मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. जनता विद्यालय खोपोलीचे मुख्याध्यापक आणि खालापूर तालुका शिक्षण मंडळाचे पदसिद्ध कार्यवाह प्रदिप देशमुख यांना मुख्याध्यापकपदी निवड झाल्याने त्यांचा सत्कार उल्हासराव देशमुख यांनी केला.

गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ज्येष्ठ नेते, उद्योजक मंडळाचे माजी उपाध्यक्ष हरेश काळे, उपाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, उपाध्यक्ष सुभाषराव देशमुख, गुलाबराव देशमुख, जितेंद्र देशमुख, सचिव दिलीप देशमुख, विनायक देशमुख, रमेश देशमुख, भरत देशमुख, शशिकांत देशमुख आदी उपस्थित होते.

## रोहा निडी येथे वृक्षारोपण

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील निडीतर्फे अष्टमी जि. प. मराठी शाळेत वनविभाग रोहा आणि वनव्यवस्थापन समिती निडी, ग्रामस्थ पंच मंडळी निडी - मुंबई यांच्या संयुक्त सहकार्याने अमृत वृक्ष आपल्या दारी वृक्षलागवड करण्यात आली.



या कार्यक्रमाला रोहा वन अधिकारी मनोज वाघमारे, संयुक्तवनव्यवस्थापन समिती निडीतर्फे अष्टमी अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे, ग्रामस्थ पंच मंडळी निडी मुंबई अध्यक्ष दिनेश मडवी, मुंबई पंच निडी सचिव चंद्रोदय वाघमारे, सचिव ग्रामस्थ पंच मंडळी निडी प्रसाद पाटील, पंचप्रमुख मुंबई दिपक गडेकर, कार्यकर्ते उपस्थित होते.

# फळबाग लागवड योजना शेतकऱ्यांसाठी संजीवनी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यामध्ये शासनाच्या फळबाग लागवड योजनेतून शेतकऱ्यांना जीवनदान मिळत आहे. या योजनेमधून आतापर्यंत ४०२ शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. पडीक जमीन आणि पडीक भातशेतीमध्ये फळरोपांची लागवड करून शेतकरी उत्पन्न घेऊ लागले आहेत.

शासनाकडून राबवली जाणारी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड योजना शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत आहे. महाड तालुका कृषी कार्यालयाकडून याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले जात आहे. नाते रायगड विभागामध्ये कृषी सहाय्यक



ए.बी. रुपणर यांनी याबाबत मोलाचे काम केले आहे.

ए. बी. रुपणर यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृतीचे काम करून अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेकडे प्रवृत्त केले आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांनी ही योजना राबवण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

महाड तालुक्यात गतवर्षापर्यंत सुमारे ४०२ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमधून या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना दिला जात आहे. आंबा, काजू, चिकू, नारळ, आवळा, कोकम, फणस फळांच्या रोपांचा समावेश यामध्ये करण्यात आलेला आहे.

महाड तालुक्यामध्ये अनेक शेतकऱ्यांनी आपल्या पडीक जमिनीमध्ये आणि पडीक भातशेतामध्ये या फळ रोपांची शास्त्रोक्त पद्धतीने कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली लागवड केलेली आहे. दोन वर्षांपूर्वी ज्या शेतकऱ्यांनी लागवड केलेले आहे त्यापैकी काहींनी या रोपांच्या माध्यमातून पण घेण्यासदेखील सुरुवात केल्याचे ए. बी. रुपनर यांनी सांगितले. महाड तालुक्यामध्ये ४०२ शेतकऱ्यांमार्फत आतापर्यंत १७९.६९ क्षेत्रावर ही लागवड झाली आहे.

**कोकणात घेतले जाणारे भातपीक मोठ्या प्रमाणावर असले तरी शेतकऱ्यांनी आपल्या पडीक जमिनीमध्ये किंवा जे शेतकरी भातशेती करीत नसतील त्यांनी या योजनेतून फळबाग लागवड करून उत्पन्न घेतले पाहिजे.**
**-ए. बी. रूपनर**
**कृषी सहाय्यक, महाड**

**या योजनेमधून मी आंबा रोपांची लागवड केली आहे. या योजनेतून नक्कीच उत्पन्न मिळणार असल्याने अन्य शेतकऱ्यांनीदेखील लाभ घ्यावा.**
**-सुनील बाटे, शेतकरी**

## कुणबी समाज साले ग्रुपतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुका कुणबी समाज साले ग्रुपतर्फे दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि.१४) मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या हस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

सोहळ्यास माजी पं. स. सभापती संगिता बक्कम, तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे उपाध्यक्ष शैलेश भोनकर, सरचिटणीस शांताराम भोरावकर, खजिनदार राम टेंबे, सदस्य काका नवगणे, गंगाराम उभारे, साले ग्रुपचे उपाध्यक्ष सुभाष गुगळे आदींसह पालक उपस्थित होते.



## कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धा

# कोलंबियाला हरवून अर्जेंटिना चॅम्पियन

**मियामी गार्डन्स : वृत्तसंस्था**

लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिनाने सलग दुसऱ्यांदा कोपा अमेरिकाचे विजेतेपद पटकावले आहे. कोलंबियाविरुद्धचा विजेतेपदाचा सामना निर्धारित वेळेत ०-० असा बरोबरीत होता. पहिल्या अतिरिक्त हाफमध्येही दोन्ही संघांना गोल करता आला नाही, पण ११२व्या मिनिटाला लुतारो मार्टिनेझने अर्जेंटिनासाठी गोल केला. या गोलनंतर ही आघाडी अर्जेंटिनाने शेवटपर्यंत कायम राहिली आणि मेस्सीचा संघ १-० असा विजय मिळवत चॅम्पियन ठरला.




अर्जेंटिनाने १६व्यांदा ही स्पर्धा जिंकली आहे. २०२१मध्ये संघाने विजेतेपदाच्या सामन्यात ब्राझीलचा पराभव केला होता, तर मेस्सीच्या कारकिर्दीतील ही चौथी आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आहे. कोपा अमेरिका अंतिम सामन्याच्या उत्तरार्धात मेस्सीच्या पायाला दुखापत झाली. घोट्याच्या दुखापतीमुळे मेस्सीला ६६व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. मैदानाबाहेर गेल्याने मेस्सी रडत होता, परंतु त्याचा संघ विजेता ठरला.

आतापर्यंत कोपा अमेरिका स्पर्धेत एकाच संघाचे वर्चस्व पाहायला मिळाले आणि ते म्हणजे अर्जेंटिना. हे विजेतेपद सर्वाधिक वेळा जिंकण्याचा विक्रम अर्जेंटिनाने केला आहे. ही स्पर्धा १९१६मध्ये पहिल्यांदा खेळली गेली, ज्याचे आयोजन अर्जेंटिनाने केले होते. उरुग्वे संघाने अंतिम फेरीत यजमान संघाचा पराभव करून पहिले विजेतेपद पटकावले. अर्जेंटिनाने १९२१मध्ये पहिल्यांदा ही ट्रॉफी पटकावली होती आणि तेव्हापासून या संघाने एकूण १५ वेळा या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे.

### मेस्सीने मोडला अल्वेसचा विक्रम

लिओनेल मेस्सीच्या कारकिर्दीतील ही चौथी आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आहे. २०२१मध्ये त्याने कोपा अमेरिकाची पहिली ट्रॉफी जिंकली. अर्जेंटिनाने २०२२मध्ये युरो आणि कोपा अमेरिका विजेते यांच्यात होणारा आर्टेमियो फ्रँची चषकही जिंकला होता. त्याच वर्षी मेस्सीने पहिला विश्वचषक जिंकला. आता मेस्सीच्या खात्यात आणखी एक आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आली आहे. मेस्सी हा ब्राझीलच्या डॅनी अल्वेसचा विक्रम मोडत क्लब व देश या दोघांसह ४५ ट्रॉफी जिंकणारा पहिला खेळाडू ठरला आहे.

# पॉवरलिफ्टर अमृता भगतला द. आफ्रिकेतील स्पर्धेत 'सुवर्ण'

## आशियाई सर्वोत्तम लिफ्टर किताबाचाही बहुमान

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेलू येथील पॉवरलिफ्टर अमृता भगत हिने नुकत्याच दक्षिण आफ्रिकेत झालेल्या आशिया पॅसिफिक आफ्रिकन पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. यासह तिने आशियाई सर्वोत्तम लिफ्टरचा किताबदेखील मिळवला आहे.



नेरळ ममदापूर येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयात अमृता भगतचे शिक्षण सुरू आहे. अमृताला लहानपणापासून क्रीडा क्षेत्राचे खूप आकर्षण होते. माध्यमिक शिक्षण पूर्ण करत असताना तिने कबड्डी खेळात प्राविण्य मिळवले. यानंतर रग्बी खेळातदेखील अमृताने यशश्री खेचून आणली होती. पुढे पॉवरलिफ्टिंग स्पधत अमृताने गरुडभरारी घेतली ती मागे न वळून पाहण्यासाठीच. नुकतेच तिने द. आफ्रिकेत झालेल्या पॉवरलिफ्टिंग बेंचप्रेस स्पर्धेत ४७ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले.

याआधी अमृताने रोमानियात झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक मिळवले होते. आता तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदकाला गवसणी घातली. याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# पनवेलच्या संतोष तेलंगेंचा लोणावळा मॅरेथॉनमध्ये सहभाग

**कळंबोली : बातमीदार**

लोणावळा येथे रविवारी (दि. १४) झालेल्या वर्षा मॅरेथॉनमध्ये पनवेलचे प्रसिद्ध गिर्यारोहक संतोष तेलंगे यांनी ५५व्या वर्षी सहभाग घेत ५० किमी अंतर मुसळधार पावसाच्या सरी अंगावर झेलत आठ तासांत पूर्ण केले. त्यांना स्पर्धा आयोजकांनी विशेष पदक देऊन सन्मानित केले.

लोणावळा येथील फॉग रन या संस्थेकडून आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या वर्षा मॅरेथॉनमध्ये राज्यभरातील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला. विविध वयोगटांनुसार स्पर्धा झाली. या स्पर्धेत पनवेल येथील प्रसिद्ध गिर्यारोहक व तळोजा औद्योगिक वसाहतीमधील भेल कंपनीत

**५५व्या वर्षी ५० किमी अंतर आठ तासांत केले पूर्ण**



कार्यरत असणारे संतोष तेलंगे यांनी सहभाग नोंदवला. त्यांनी ५० किमीचे अंतर आठ तासात पूर्ण करून हम भी कुछ कम नही हे दाखवून दिले आहे. त्यांनी यापूर्वीही अनेक मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतलेला आहे.

# ऐतिहासिक! स्पेनने चौथ्यांदा जिंकला युरो कप

**बर्लिन : वृत्तसंस्था**

युरो कप २०२४चा अंतिम सामना आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दोन सर्वोत्तम संघ स्पेन आणि इंग्लंड यांच्यात खेळवला गेला. दोन्ही संघांमध्ये चुरशीची स्पर्धा झाली, ज्यामध्ये अखेरीस स्पॅनिश संघाने अंतिम सामना २-१ने जिंकला आणि विजेतेपदावरही आपले नाव कोरले. यासह स्पेन चार वेळा युरो कप जिंकणारा पहिला देश बनला आहे. चौथी ट्रॉफी जिंकण्यासाठी त्यांना तब्बल १२ वर्षे प्रतीक्षा करावी लागली.

### इंग्लंडचा पुन्हा पराभव



इंग्लंडला आतापर्यंत युरो चॅम्पियनशिप जिंकण्यात यश मिळालेले नाही. २०२०च्या युरो कप फायनलमध्ये पराभूत झाल्यानंतर आता इंग्लंडला २०२४च्या फायनलमध्येही पराभवाला सामोरे जावे लागले.

स्पेन आणि इंग्लंड यांच्यातील अंतिम सामन्यात इतकी जबरदस्त चढाओढ सुरू होती की पहिला गोल ४७व्या मिनिटाला झाला, ज्यामध्ये स्पॅनिश खेळाडू निकोने पहिला गोल केला. या गोलसह स्पेनने सामन्यात निश्चितपणे १-० अशी आघाडी घेतली होती, परंतु यानंतर इंग्लंडने झटपट पुनरागमन केले आणि सामन्याच्या ७३व्या मिनिटाला पाल्मरने गोलरक्षकाला चुकवत जबरदस्त गोल केला. त्यामुळे सामना १-१ असा बरोबरीत आला.

सामना १-१ असा बरोबरीत आणत इंग्लंडने अतिशय आक्रमक खेळ करण्यास सुरुवात केली. त्याला प्रत्युत्तरात स्पेनचा संघही तसाच खेळताना दिसला आणि खेळाच्या ८६व्या मिनिटाला स्पेनचा अनुभवी खेळाडू ओयारझाबालने गोल करून संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. ९० मिनिटांचा खेळ संपल्यानंतर अतिरिक्त वेळेसाठी दिलेल्या चार मिनिटांतही इंग्लंडचा संघ एकही गोल करण्यात यशस्वी होऊ शकला नाही आणि स्पेनने १२ वर्षांनंतर युरो कप जिंकला.

# शुबमन गिलने हिटमॅन रोहित शर्माला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली झिम्बाब्वे दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाने यजमानांवर ४-१ असा विजय मिळवला. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर भारताने शानदार पुनरागमन करत सर्व सामने जिंकून मालिका खिशात घातली. या मालिकेत कर्णधार शुबमननेही एक खास कामगिरी आपल्या नावावर केली आहे, ज्यामध्ये त्याने रोहित शर्माला मागे टाकले.

**टी-२० मालिकेत सर्वाधिक धावा करणारा दुसरा भारतीय कर्णधार**

शुबमन गिलकडे पहिल्यांदाच टीम इंडियाचे कर्णधारपद देण्यात आले होते. गिलने त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियासाठी पहिली टी-२० मालिका जिंकली. या मालिकेत गिलची वैयक्तिक कामगिरीही चांगली होती. फलंदाजी करताना गिलने या मालिकेत १७० धावा केल्या. यादरम्यान त्याने दोन अर्धशतकेही झळकावली. टी-२० मालिकेत कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करणारा गिल हा तिसरा खेळाडू ठरला आहे.

गिल आता रोहित शर्माच्या पुढे गेला आहे. रोहितने कर्णधार म्हणून २०१७मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत १६२ धावा केल्या होत्या. शुबमनच्या पुढे फक्त भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आहे. कर्णधार म्हणून विराटने २०२१मध्ये इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत २३१ धावा केल्या होत्या.

# आरडीसीएतर्फे पंच, स्कोअरर्ससाठी शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या वतीने घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पंच व गुणलेखक (स्कोअरर्स) परीक्षेसाठीच्या पूर्वतयारीसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) ने नुकतीच खोपोली येथील महाराजा बँक्वेट हॉलमध्ये बीसीसीआयचे पंच रोहन इंगवले व बीसीसीआयच्या स्कोअरर केतकी नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व क्रिकेट पंच व स्कोअरर्स यांच्यासाठी शिबिराचे आयोजन केले होते.



एमसीएने या वर्षी राज्यातील पंच व स्कोअरर्सच्या मुख्य परीक्षेसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज आल्याने आधी पूर्वचाचणी परीक्षा (स्क्रीनिंग टेस्ट) घेण्याचे ठरविले आहे. रायगड जिल्ह्यातून पंच परीक्षेसाठी ५६, तर स्कोअरर्ससाठी २० उमेदवारांनी परीक्षेचे अर्ज केले आहेत. पूर्वचाचणी परीक्षा २१ जुलै रोजी पुणे येथे घेण्यात येणार आहे. या परीक्षेत किमान ८०%पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांनाच मुख्य परीक्षेसाठी बसता येणार असल्याचे एमसीएकडून जाहीर करण्यात आले आहे.

गतवर्षीच्या राज्यस्तरीय पंच पॅनल परीक्षेत रायगड जिल्ह्यातून उत्तीर्ण झालेले अ‍ॅड. पंकज पंडित व सुयोग चौधरी यांचा सत्कार आरडीसीएमार्फत करण्यात आला. बीसीसीआयचे पंच रोहन इंगवले व बीसीसीआयच्या स्कोअरर केतकी नाईक यांनी उपस्थित सर्वांना चांगले मार्गदर्शन केल्याबद्दल आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, सदस्य यशवंत साबळे, राजेश पाटील, समीर मसुरकर, अ‍ॅड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे, शंकर दळवी, विनय पाटील, चंद्रकांत म्हात्रे, विनोद सोलंकी यांनी त्यांचे आभार मानले.

# लामिने यामलने मोडला दिग्गज पेले यांचा विक्रम

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या फायनलमध्ये सहभागी होणारा सर्वात तरुण खेळाडू

**पॅरिस : वृत्तसंस्था**

युरो कप स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्पेन विरुद्ध इंग्लंड यांच्या सामना खेळवला गेला. या सामन्यात स्पेनने उत्कृष्ट कामगिरी करत सामना २-१ने जिंकला. या विजयासह विक्रमी चार वेळा युरो कपचे जेतेपद पटकावणारा स्पेन पहिला संघ ठरला आहे. या संघातील तरुण खेळाडू असलेला लामिने यामल यानेही एक विक्रम आपल्या नाव केला आहे. फुटबॉलमधील सर्वकालीन महान खेळाडू पेले यांचा विक्रम यामलने मोडला आहे.



लामिनेने उपांत्य फेरीत झालेल्या सामन्यात महत्त्वपूर्ण गोल करत संघाला अंतिम फेरीत स्थान मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. यासह अंतिम सामन्यात खेळत लामिनेने एक विक्रम आपल्या नावे केला आहे. मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहभागी होणारा स्पेनचा यामल हा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. लामिनेचे वय १७ वर्षे आणि एक दिवस आहे.

यामलने पेले यांना मागे टाकत सर्वात कमी वय असणारा खेळाच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. १९५८च्या फिफा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत सहभागी झालेल्या पेले यांचे वय १७ वर्षे २४९ दिवस होते, तर लामिने हा पेले यांच्यापेक्षा २४८ दिवसांनी लहान आहे. अशा रितीने लामिनेने पेले यांना मागे टाकत हा विक्रम आपल्या नावे केला आहे.

स्पॅनिश खेळाडू यामलने आपल्या अतुलनीय कामगिरीने फुटबॉल जगताला भुरळ घातली आहे. बार्सिलोनाचा हा खेळाडू या स्पर्धेतील सर्वात चर्चेत असलेला खेळाडू बनला आहे, ज्याची लिओनेल मेस्सीशी तुलना केली जात आहे.

# आत्माराम मोरे चषक कबड्डी स्पर्धेत समता, मोडक, ज्ञानेश्वर विद्यालयाची विजयी सलामी



**मुंबई : प्रतिनिधी**

आत्माराम मोरे प्रतिष्ठान व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे रोझरी हायस्कूल डॉकयार्ड (मुंबई) सहकार्याने कबड्डी दिनानिमित्त सुरू झालेल्या आत्माराम मोरे स्मृतीचषक इंडोर कबड्डी स्पर्धेत समता विद्यामंदिर-घाटकोपर, ताराबाई मोडक हायस्कूल-दादर, ज्ञानेश्वर विद्यालय-वडाळा, ऑल इंडिया एज्युकेशन सोसायटी हायस्कूल-घाटकोपर आदी संघांनी सलामीचे सामने जिंकले.

स्पर्धेचे उद्घाटन रोझरी हायस्कूलच्या प्रिन्सिपल सिस्टर विजया चलील, सेक्युर वन सेक्युरिटी सर्व्हिसचे सुरक्षा मुख्याधिकारी अरुण माने, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या उपस्थितीत झाले.

डॉकयार्ड येथील रोझरी हायस्कूल सभागृहात मॅटवर ही स्पर्धा टायब्रेकरसाठी होणाऱ्या ५-५ चढायांमध्ये मुंबईतील १२ शालेय संघांच्या सहभागाने सुरू झाली आहे. समता विद्यामंदिरने यजमान रोझरी हायस्कूलचा ८-४ असा पराभव करताना विजयी संघाचे चढाईपटू मोहित विश्वकर्मा व हर्ष पावसकर चमकले. अष्टपैलू आर्यन दिवे व अनिश पोळेकर यांच्या आक्रमक चढायामुळे ताराबाई मोडक हायस्कूलने भायखळ्याच्या अँटोनियो डिसोझा हायस्कूलवर ९-२ असा विजय मिळविला. ज्ञानेश्वर विद्यालयाने सांघिक खेळाच्या बळावर माझगावच्या सर एली कदुरी हायस्कूलचे आव्हान १२-१ असे सहज संपुष्टात आणले. संपूर्ण डावात बरोबरी झालेल्या सामन्यात अखेर ऑल इंडिया एज्युकेशन सोसायटी हायस्कूलने चेंबूरच्या अफॅक हायस्कूलचा ९-८ असा निसटता पराभव केला.

# टी-२०मध्ये संजू सॅमसनच्या षटकारांचे त्रिशतक

**मुंबई : प्रतिनिधी**

झिम्बाब्वे दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाने पाच सामन्यांची टी-२० मालिका ४-१ने जिंकली. यातील पाचव्या व शेवटच्या सामन्यात भारताच्या संजू सॅमसनने आपल्या टी-२० कारकिर्दीतील ३०० षटकार पूर्ण केले. या फॉरमॅटमध्ये ३०० षटकार मारणारा तो सातवा भारतीय फलंदाज ठरला आहे.

संजूने आपल्या टी-२० कारकिर्दीत आतापर्यंत ३०२ षटकार मारले आहेत. त्याचवेळी या सामन्यात अवघ्या ३९ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने एकूण ४५ चेंडूंत ५८ धावा केल्या. या दरम्यान संजूच्या बॅटमधून एक चौकार आणि चार षटकार दिसले. हे त्याचे टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील दुसरे अर्धशतक आहे.

# विम्बल्डन विजेत्या अल्काराझवर पैशांचा पाऊस

## उपविजेत्या जोकोविचलाही घसघशीत बक्षीस





**विम्बल्डन : वृत्तसंस्था**

स्पेनचा २१ वर्षीय खेळाडू कार्लोस अल्काराझने विम्बल्डन स्पर्धेत ऐतिहासिक विजय नोंदवला. त्याने अंतिम सामन्यात सर्बियन दिग्गज नोव्हाक जोकोविचचा पराभव करून सलग दुसऱ्यांदा हे विजेतेपद पटकावले आहे. या विजेतेपदासह अल्काराझवर पैशांचा पाऊस पडला.

अल्काराझने जोकोविचला सरळ सेटमध्ये ६-२, ६-२, ७-६ अशा फरकाने धूळ चारली. विम्बल्डन २०२४ पुरुष एकेरी विजेत्या कार्लोस अल्काराझला बक्षीस रक्कम म्हणून ३,४२७,३९६ पौंड (२८ कोटी ३५ लाख रुपये) मिळाले, तर उपविजेता नोव्हाक जोकोविचलाही बक्षीस म्हणून घसघशीत रक्कम मिळाली. त्याला १,४००,००० पौंड (१४ कोटी ७० लाख रुपये) मिळाले. गेल्या वर्षी विम्बल्डन २०२३ विजेत्या अल्काराझला २५ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम देण्यात आली होती.

विम्बल्डन २०२४ च्या अंतिम सामन्यात स्पेनच्या कार्लोस अल्काराझने पहिल्या दोन सेटमध्ये जोकोविचचा सहज

### एकेरी विजेत्यांना मिळालेली बक्षीस रक्कम

- **विजेता : २८ कोटी ३५ लाख रुपये**
- **उपविजेता : १४ कोटी ७० लाख रुपये**
- **उपांत्य फेरी : सात कोटी ७५ हजार रुपये**
- **उपांत्यपूर्व फेरी : तीन कोटी ९३ लाख ७५ हजार रुपये**
- **चौथी फेरी : दोन कोटी ३७ लाख ३० हजार रुपये**
- **तिसरी फेरी : एक कोटी ५० लाख १५ हजार रुपये**
- **दुसरी फेरी : ९७ लाख ६५ हजार रुपये**
- **पहिली फेरी : ६३ लाख रुपये**

पराभव केला. त्याने पहिले दोन सेट ६-२, ६-२ असे जिंकले, पण नंतर तिसरा सेट जिंकण्यासाठी त्याला खूप संघर्ष करावा लागला. तिसरा सेट टायब्रेकरपर्यंत गेला, ज्यामध्ये कार्लोसने कारकिर्दीतील चौथे ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले. कार्लोसने यूएस ओपन २०२२, विम्बल्डन २०२३, फ्रेंच ओपन २०२४ जिंकले आणि आता विम्बल्डन २०२४ जिंकले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com